सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ११५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २८ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## अमेरिकेत शिकायला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना ट्रम्प प्रशासनाकडून मोठा धक्का; व्हिसासाठी मुलाखती थांबवल्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८वाशिंग्टन**

परदेशी विद्यार्थी व्हिसासाठी नवीन मुलाखती न घेण्याचे आदेश ट्रम्प प्रशासनाने जगभरातील अमेरिकन दूतावासांना देण्यात आले आहे. द गार्डियन यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. सरकार सर्व विद्यार्थी आणि एक्सचेंज अभ्यागत व्हिसा अर्जदारांसाठी सोशल मीडिया तपासणी वाढवण्याची योजना आखत असताना हे पाऊल उचलण्यात आले आहे.मंगळवारी पाठवलेल्या परराष्ट्र विभागाच्या संदेशात म्हटले आहे, पुढील आदेश येईपर्यंत कॉन्सुलर विभागांनी कोणताही अतिरिक्त विद्यार्थी किंवा एक्सचेंज अभ्यागत (एफ, एम आणि जे) व्हिसा अपॉइंटमेंट क्षमता वाढवू नये. ही सूचना विद्यार्थी आणि एक्सचेंज व्हिसांना लागू होते. या व्हिसाची अमेरिकेत शिक्षण घेण्यासाठी अनेक परदेशी विद्यार्थ्यांना आवश्यकता असते.



या विलंबामुळे व्हिसा प्रक्रियेत बराच विलंब होऊ शकतो आणि उत्पन्नासाठी आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांवर अवलंबून असलेल्या विद्यापीठांवर परिणाम होऊ शकतो. गेल्या वर्षी दहा लाखांहून अधिक आंतरराष्ट्रीय विद्यार्थी अमेरिकेत शिक्षण घेत होते, यामुळे अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेत सुमारे ४३.८ अब्ज योगदान दिले आहे, असे NAFSA असोसिएशनने म्हटले आहे.

ट्रम्प प्रशासन विद्यार्थी व्हिसासाठीचे नियम कडक करण्याचा विचार करत असताना हे नवीन धोरण आले आहे. सरकारचे म्हणणे आहे की ते सर्व विद्यार्थी व्हिसा अर्जदारांसाठी सोशल मीडिया तपासणी वाढवण्यात येणार आहेत. कॉन्सुलर अधिकारी इंस्टाग्राम, टिकटॉक आणि एक्स सारख्या प्लॅटफॉर्मवरील पोस्ट, लाईक्स, कमेंट्स आणि शेअर्स पाहिले जाणार आहेत. यामुळे राष्ट्रीय सुरक्षेला धोका असल्याचे दिसत असलेल्या कोणत्याही कंटेंटची चिन्हे तपासता येणार आहेत.मार्चपासून, कॉन्सुलर अधिकारी पॅलेस्टिनी समर्थक निदर्शनांमध्ये सामील झालेल्या विद्यार्थ्यांच्या सोशल मीडियाची तपासणी करत आहेत. हा व्यापक विस्तार सर्व विद्यार्थी व्हिसा अर्जदारांना लागू होईल. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही विद्यापीठांवर अति-डाव्या विचारांना प्रोत्साहन देण्याचा आरोप केला आहे आणि त्यांच्या प्रशासनाने नवीन व्हिसा तपासणीचा संबंध यहूदी-विरोधीतेशी लढण्याच्या प्रयत्नांशी जोडला आहे.

## काश्मीर, गुजरात, पंजाब, राजस्थान; पाकिस्तानला लागून असलेल्या सीमावर्ती भागात उद्या मॉक ड्रिल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८जम्मू**

पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने ६-७ मे च्या मध्यरात्री ऑपरेशन सिंदूर सुरू केले. सुमारे २५ मिनिटे चाललेल्या या ऑपरेशनमध्ये भारतीय सैन्याने पाकिस्तान आणि पीओकेमधील ९ दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले. या कारवाईत सुमारे १०० दहशतवादी ठार झाले. त्या ऑपरेशनदरम्यान देशभरात मॉक ड्रिल राबविण्यात आले होते.



आता पुन्हा एकदा गुरुवारी संध्याकाळी पाकिस्तानच्या सीमेला लागून असलेल्या राज्यांमध्ये मॉक ड्रिल आयोजित करण्यात आले आहे. हे मॉक ड्रिल गुजरात, पंजाब, राजस्थान आणि जम्मू-काश्मीरमध्ये आयोजित केले आहे. या काळात नागरिकांना सतर्क राहण्याचे निर्देशही दिले जातील.

भारताच्या ऑपरेशन सिंदूरमुळे पाकिस्तानमध्ये प्रचंड घबराटीचे वातावरण आहे. ऑपरेशन सिंदूरसारख्या आणखी एका ऑपरेशनची पाकिस्तानला भीती आहे. भारताने आतापर्यंत फक्त ९ दहशतवादी तळांवर हवाई हल्ले केले आहेत. अशा परिस्थितीत पाकिस्तानमधील आणखी १२ दहशतवादी तळांची यादी भारताकडे आहे. यापूर्वीच भारताने स्पष्ट केले होते की, दहशतवाद्यांचे उर्वरित तळही नष्ट केले जातील.

भारत यासाठी पूर्णपणे सज्ज आहे. भारताच्या सीमावर्ती भागात हवाई संरक्षण यंत्रणाही सतर्क आहेत. पाकिस्तानची दहशत आणि नियंत्रण रेषेवर होणारा गोळीबार पाहून भारतीय सैन्याने काश्मीरच्या १० जिल्ह्यांमध्ये नियंत्रण केंद्रे स्थापन केली आहेत. आता अशातच सीमावर्ती भागात मॉक ड्रिल आयोजित केल्यामुळे पाकिस्तानही सतर्क झाला आहे.

## मोदी सरकारचं शेतकऱ्यांना मोठं गिफ्ट खरीप पिकांच्या एमएसपीमध्ये वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८नवी दिल्ली**



केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बुधवारी (२८ मे २०२५) झालेल्या बैठकीत अनेक मोठे निर्णय घेण्यात आले. या बैठकीत मोदी सरकारने शेतकऱ्यांनाही मोठे गिफ्ट दिले आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने २०२५-२६ च्या खरीप हंगामासाठी तांदळाच्या किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) ६९ रुपयांची वाढ करून, ती २,३६९ रुपये प्रति क्विंटल करण्यास मान्यता दिली आहे. यासाठी २ लाख ७ हजार कोटी रुपये एवढा खर्च येणार आहे.

यासंदर्भात माहिती देताना केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, शेतकऱ्यांसाठी एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. गेल्या १०-११ वर्षांत खरीफ पिकांसाठीच्या एमएसपी मध्ये मोठी वाढ करण्यात आली आहे. याचाच एक भाग म्हणून २०२५-२६ च्या खरीप हंगामासाठीही किमान आधारभूत किमतीला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. एकूण रक्कम सुमारे २,०७,००० कोटी रुपये असण्याचा अंदाज आहे. प्रत्येक पिकासाठी खर्चासह ५० टक्के रक्कम विचारात घेण्यात आली आहे.केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, शेतकऱ्यांसाठी व्याज सवलत कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, ज्यासाठी १५,६४२ कोटी रुपये खर्च येईल. किसान क्रेडिट कार्ड वर २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज ४ टक्के व्याजदराने देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. देशात ७.७५ कोटींहून अधिक किसान क्रेडिट कार्ड खाती आहेत. याचा आता लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा होईल.

**केंद्रीय मंत्रिमंडळाचे इतर निर्णय**

याशिवाय, मध्य प्रदेशातील रतलाम ते नागदा दरम्यानचा रेल्वे मार्ग ४ लेन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. याची लांबी ४१ किलोमीटर असेल. तसेच, महाराष्ट्रातील वर्धा रेल्वे मार्ग आणि तेलंगणामधील बल्लारशाह रेल्वे मार्ग ४ लेन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने बडवेल-गोपावरम गाव (एनएच-६७) ते आंध्र प्रदेशातील गुरुविंदपुडी (एनएच-१६) पर्यंतचा ४-लेन बडवेल-नेल्लोर महामार्ग बांधण्यास मान्यता देण्यात आली आहे. या महामार्गाची लांबी १०८.१३४ किलोमीटर एवढी आहे, त्यासाठी ३६५३.१० कोटी रुपये एवढा खर्च अपेक्षित आहे.

## ऑपरेशन सिंदूर आणखी आठवडाभर.; पाकला कंटाळलेल्या बलुच नेत्याचं थेट मोदींना भलं मोठं पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८बलुचिस्तान**

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानमधील ९ दहशतवादी ठिकाणांवर हवाई हल्ला करत १०० पेक्षा जास्त दहशतवाद्यांना ठार मारले आहे. ऑपरेशन सिंदूरची चर्चा संपूर्ण जगात होत असताना बलुचिस्तानचे मानवाधिकार




कार्यकर्ते आणि पत्रकार मीर यार बलोच यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून पाकिस्तानवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

मीर यार बलोच यांनी लिहिलेल्या पत्राच्या सुरुवातीला जगाला पाकिस्तानचे अणुशस्त्रे जप्त करण्याचे आवाहन केले आहे. तसेच त्यांनी या पत्रामध्ये पाकिस्तानने बलुचिस्तानमध्ये केलेल्या अणुचाचण्यांना नरसंहाराचा उल्लेख देखील केला आहे. याच बरोबर त्यांनी भारताने बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यलढ्यात उघडपणे पाठिंबा द्यावा असे आवाहन देखील त्यांनी पंतप्रधान मोदींना केले आहे.

पत्रात, बलुचिस्तान नेत्याने थेट पाकिस्तानी सैन्य आणि आयएसआयवर दहशतवादी संघटना निर्माण केल्याचा आरोप केला आहे. त्यांनी असा दावा केला की आयएसआय दर महिन्याला एक नवीन दहशतवादी संघटना तयार करते आणि त्यांचा वापर भारत, अफगाणिस्तान, बलुचिस्तान, अगदी अमेरिका आणि इस्त्रायलविरुद्ध करते. बलुच नेत्याने म्हटले आहे की, पाकिस्तान दहशतवादाची जननी आहे. जोपर्यंत त्याची मुळे उखडली जात नाहीत तोपर्यंत दहशतवाद संपणार नसल्याचे म्हंटले आहे.

## ठाकरे गटाला मोठे खिंडार; नाशिकमधील माजी आमदारांचा उद्धवसेनेला रामराम, शिंदे गटात प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८नाशिक**

मुंबईसह राज्यातील महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची लगबग सुरू झाली आहे. महायुती आणि महाविकास आघाडीने कंबर कसून तयारीला सुरुवात केली आहे. एकीकडे महापालिका निवडणुका महायुतीत लढल्या जाणार असल्याचे म्हटले जात असले तरी ठाकरे गटाला मुंबई पालिकेच्या निवडणुकीतून हद्दपार करण्याचा चंग भाजपाने बांधलेला पाहायला



मिळत आहे. तर दुसरीकडे, ठाकरे गटाचे निम्मे माजी नगरसेवक शिंदे गटात गेले आहेत. यातच आता ठाकरे गटातील नाशिकमधील माजी आमदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

मिळालेल्या माहितीनुसार, ठाकरे गटाच्या माजी आमदार निर्मला गावित यांनी उद्धव ठाकरे गटाला अखेरचा जय महाराष्ट्र केला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत त्यांनी प्रवेश केला आहे. निर्मला गावित यांनी शिवसेना शिंदे गटात केलेला प्रवेश उद्धवसेनेसाठी मोठा धक्का मानला जात आहे. या पक्षप्रवेशावेळी मोठ्या प्रमाणात महिलाही शिवसेना शिंदे गटात सामील झाल्याचे म्हटले जात आहे.


एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आपला प्रवेश संपन्न होत आहे. एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली २०१९ ला शिवसेनेत आले होते. आता नेतृत्व बदलले आहे. पक्ष शिवसेनाच आहे. जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी शिवसेनेत प्रवेश केला आहे. तालुक्याच्या प्रश्नांना हात घालण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन असू द्या. आजपासूनच कामाला लागणार आहे, असे मनोगत निर्मला गावित यांनी बोलून दाखवले.

## महाविकास आघाडी गेली खड्ड्यात, राहुल गांधींना काळे फासणार

### सावरकरांविषयी अपशब्द सहन करणार नाही, ठाकरे गटाच्या नेत्याचा काँग्रेसला इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८नाशिक**

२०१९ साली घडलेल्या नाट्यमय घडामोडींनंतर गेल्या पाच सहा वर्षांपासून आपापसातील परस्परविरोधी मुद्दे बाजूला करत शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेस हे महाराष्ट्राच्या राजकारणात महाविकास आघाडीच्या माध्यमातून एकत्रित राजकारण करत आहेत. मात्र स्वातंत्र्यवीर सावरकरांबाबत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी हे सातत्याने घेत असलेली आक्रमक भूमिका आणि करत असलेली वादग्रस्त टीका यामुळे अनेकदा दोन्ही पक्षांमध्ये तणाव निर्माण झाल्याचं दिसून आलं होतं. आता पुन्हा एकदा सावरकरांच्या मुद्द्यावरून ठाकरे गटाच्या एका नेत्याने राहुल गांधी यांना आक्रमक इशारा दिल्याने दोन्ही पक्षांमधील संबंध ताणले गेले आहेत.



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नाशिकमधील नेते बाळा दराडे यांनी राहुल गांधी यांना इशारा दिला आहे. राहुल गांधी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकांबद्दल अपशब्द वापरले तर ते नाशिकला आल्यावर त्यांच्या तोंडाला काळं फासू, काळं फासता आलं नाही तर त्यांच्यावर दगडफेक करू, असा इशारा बाळा दराडे यांनी दिला आहे.

दरम्यान, आज राहुल गांधी यांना इशारा देताना बाळा दराडे म्हणाले की, राहुल गांधी यांनी काही दिवसांपूर्वी स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल अपशब्द वापरले होते. त्यांना माफीवीर म्हटलं होतं, त्यांच्या त्या विधानाचा आम्ही निषेध करतो. राहुल गांधींविरोधात नाशिकमधील वकिलांनी याचिका दाखल केली आहे. त्याच्या सुनावणीसाठी राहुल गांधी कोर्टात हजर होणार आहेत, अशी माहिती आहे. पण ज्यावेळी राहुल गांधी नाशिकमध्ये येतील, तेव्हा आम्ही त्यांच्या तोंडाला काळं फासू. तसेच त्यांच्यापर्यंत आम्हाला पोहोचू दिलं नाही, तर आम्ही त्यांच्या ताफ्यावर दगडफेक करू आणि सावरकरांचे हिंदुत्ववादी सैनिक कसे असतात हे त्यांना दाखवून देऊ, अशी धमकी बाळा दराडे यांनी दिली होती.

## सावरकरांची बॅरिस्टर पदवी परत मिळवणार: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा निर्धार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८मुंबई**

स्वातंत्र्यावीर विनायक दामोदर सावरकर ही एक व्यक्त नव्हे, तर एक अखंड ज्वाला आहे. एक विचार आहे. एक संस्था आहे. अत्यंत तरुण वयात 'स्वातंत्र्य माझे ध्येय' अशी शपथ घेऊन त्यांनी क्रांतीच्या महासागरात उडी घेतली. सावरकरांनी देशप्रेमाची आग पेटवली. त्यांनी लिहिलेलं 'अनादि मी, अनंत मी' हे गीत आजही देशप्रेमाची अमर प्रेरणा बनून राहतं, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा पट मान्यवरांसमोर उलगडला.



स्वातंत्र्यवीर सावरकरांची इंग्रजांनी चुकीने काढून घेतलेली बॅरिस्टर पदवी मरणोत्तर परत मिळवण्यासाठी राज्य शासन इंग्लंडमधील संस्थांशी संपर्क साधणार असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. ते 'स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर अभ्यास व संशोधन केंद्राच्या उदघाटन सोहळ्यात बोलत होते. मुंबई विद्यापीठ परिसरात हा कार्यक्रम झाला.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई विद्यापीठाच्या परिसरात हा सोहळा रंगला. या केंद्राच्या माध्यमातून सावरकरांचे विचार, कार्य आणि क्रांतीशील धग अभ्यासकांसाठी एक पर्वणी ठरणार आहे. विशेष म्हणजे या सोहळ्यात स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनप्रवासाचे दस्तऐवजीकरण, त्यांच्या विचारांचा उज्ज्वल ठसा आणि राष्ट्रासाठीच्या त्यागाची गाथा उलगडणारा एक व्हिडिओ दाखवण्यात आला.

कार्यक्रमात देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'अभिनव भारत, लंडनमधील इंडिया हाऊस, जोसेफ मॅझिनीचे आत्मचरित्र, ही केवळ स्थळं व ग्रंथ नव्हते तर ती क्रांतीची प्रयोगशाळा होती. ज्यामध्ये सावरकरांनी देशप्रेमाची आग पेटवली. आपल्या लेखणीतून त्यांनी तरुणांच्या मनात स्वतंत्रतेची ज्योत चेतवली. म्हणूनच इंग्रज सत्ताधाऱ्यांना सावरकरांचा उल्लेख 'सर्वात धोकादायक क्रांतिकारक' असा करावा लागला.

## संपादकीय ......

# उडाली दाणादाण...

उन्हाळ्याच्या काहिलीने त्रस्त झालेले लोक आतुरतेने जून महिन्याची वाट पाहत होते. पावसाची नक्षत्रे सुरू होतील आणि सात ते दहा जूनच्या दरम्यान पावसाचे आगमन होईल, असाच सगळ्यांचा अंदाज होता. मान्सून हा पुरातन वास्तुपुरुषासारखा असावा असे वाटते. आपले अक्राळ-विक्राळ बाहू म्हणजेच ढग घेऊन तो आधी अंदमान-निकोबारच्या किनार्यावर धडकतो. इथून तो केरळमध्ये येतो आणि एकदा का केरळमध्ये आला की, साधारणतः सात दिवसांत महाराष्ट्राची किनारपट्टी आणि गोवा या भागामध्ये प्रवेश करतो. स्वतः हवामान विभागही या वेळेला गोंधळात पडलेला होता. ठरलेल्या वेळी म्हणजे, साधारण एक-दोन जूनच्या आसपास तो महाराष्ट्रात प्रवेश करेल, असा अंदाज वर्तवण्यात आला होता. दरम्यान, छोट्या-मोठ्या सारी येत होत्या.

अवकाळी पाऊस काही आपल्याला नवीन नाही. उन्हाळ्यामध्ये अधूनमधून विजांच्या कडकडाटासह पडणारा पाऊस हा अवकाळी असतो. तो पाच-दहा किलोमीटर परिसरात कुठे पडतो, तर कुठे पडत नाही. ज्याचा काही नेम नाही, तो पाऊस म्हणजे अवकाळी पाऊस. या काळात शेतकरीवर्ग जमिनीची मशागत करून तिला पेरणीसाठी तयार करून ठेवत असतो.

गत सात दिवसांपासून महाराष्ट्राच्या सर्व भागांत तुफान पाऊस बरसण्यास सुरुवात झाली, तेव्हा हवामान विभागाने सांगितले की, हा अवकाळी नाही तर हा मान्सूनचा पाऊस आहे. या पावसाने शहरांची आणि ग्रामीण विभागाची पुरेपूर वाताहत केली आहे. पावसाचा सुरुवातीचा धमाका मुंबईमध्ये जोरात पाहावयास मिळतो तसा तो याही वेळी पाहण्यास मिळाला. नवीन झालेले भुयारी मेट्रो स्टेशन्स पाण्याने भरून गेले. असंख्य ठिकाणी मोठ्या कार आणि गाड्या पाण्यावर तरंगताना दिसल्या.स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच महानगरपालिका आणि नगरपालिका आपापल्या परीने येणार्या पावसाची तयारी करत असतात. त्या सगळ्यांची धांदल उडाली आणि सगळे नियोजन बिघडून गेले. कारण, पावसाने अपेक्षेपेक्षा पंधरा दिवस आधीच एन्ट्री मारली. बहुतेक देवाने त्याच्या कॅलेंडरमधील मे महिना काढून टाकला आहे की काय, अशी शंका येण्यास सुरुवात झाली. जे काय असेल ते असो; परंतु भरपावसाळ्यात ऐकू येणारे शब्द चक्क उन्हाळ्यात ऐकू येण्यास सुरुवात झाली. उदाहरणार्थ, वेगवेगळ्या रंगांचे अलर्ट येण्यास सुरुवात झाली आहे. अजून मे महिना संपला नाही, तरी कुठे रेड अलर्ट, कुठे ऑरेंज अलर्ट, तर कुठे यलो अलर्ट देण्यात आलेला आहे.बाजारात प्रचंड प्रमाणात आलेले आंबे या पावसामुळे फार हातघाईला आले. लोक उन्हाळ्यातच आंबे खातात आणि आंबे खाण्याच्या दिवसांमध्येच पावसाळा सुरू झाला. त्यामुळे आंब्याचे मार्केट पार डाऊन झाले. पावसाळा हा अन्न पचनसंस्थेला घातक असतो. अशावेळी आंबे खाऊन पोट बिघडवून घेण्याची रिस्क कोण घेणार?

# रखडलेल्या घरकुलांचे स्वप्न ५ ब्रास मोफत वाळूने होणार पूर्ण

## घरकुलासाठी मोफत वाळू पुरवण्याचा निर्णय घेणारा चांदूर बाजार तालुका जिल्ह्यातील पहिला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८चांदुर बाजार-** वाळू मिळत नसल्याने तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांचे स्वप्न रखडले होते. आता मात्र महसूल प्रशासनाने पुढाकार घेत नवी सकारात्मक सुरुवात केली आहे. त्यासाठी तहसील कार्यालयामधूनच मोफत पाच ब्रास वाळूची पास दिली जाते. महसूल प्रशासनाच्या या निर्णयामुळे घरकुलांचे स्वप्न बघणारे आनंदून गेले असून लाभार्थ्यांची वाळूअभावी रखडलेली घरकुले पूर्ण होणार आहे. घरकुलासाठी मोफत वाळू पुरवण्याचा निर्णय घेणारा चांदूर बाजार तालुका हा जिल्ह्यातील पहिला तालुका आहे.चांदूर बाजार तालुक्यामध्ये पंतप्रधान आवास योजने अंतर्गत ३०१७ आणि रमाई आवास योजनेची २६४ घरकुलं मंजूर झाली आहेत. मात्र वाळू मिळत नसल्याने, कित्येक दिवसापासून या लाभार्थींना घरकुलाचा पहिला टप्पा मिळूनदेखील, लाभार्थींना घरकुल बांधकामाला हातही लावता आला नाही.



शासनाने घरकुल मंजूर केले असतानासुद्धा वाळूअभावी घरकुलाचे स्वप्न अपूर्ण राहते की काय, अशी परिस्थिती त्यामुळेच निर्माण झाली होती. या परिस्थितीची शासनाने दखल घेऊन, शासन निर्णय काढला. लाभार्थींना ५ ब्रास वाळू मोफत देण्याचा उल्लेख या निर्णयात आहे. यामध्ये घरकुल लाभार्थ्याला वाळूसाठी ऑनलाइन अर्ज करावा लागतो.दरम्यान शासन निर्णय होताच तहसील विभागाने पुढाकार घेऊन लाभार्थ्याला तहसीलमध्ये बोलवून त्यांचा अर्ज ऑनलाईन भरुन घेतला. पुढे त्यावर जुजबी प्रक्रिया करून त्यांना हातो-हात पाच ब्रास वाळूची पास उपलब्ध करून दिली.

शासनाचे नाविन्यपूर्ण धोरण यशस्वी करण्याकरिता उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांच्या मार्गदर्शनात तहसीलदार रामदास शेळके, निवासी नायब तहसीलदार लक्ष्मीकांत तिवारी, महसूल नायब तहसीलदार मनोज सोनारकर यांच्यासह सहायक महसूल अधिकारी सचिन कन्नमवार हे विशेष प्रयत्न करत आहे. आतापर्यंत ४९ जणांना लाभ अमरावती जिल्ह्यात चांदूर बाजार तहसील कार्यालयाने सर्वप्रथम ऑनलाइन मोफत वाळू पासेस देण्याची कार्यवाही सुरू केली आहे. आतापर्यंत चांदूर बाजार तहसीलने घरकुल मंजूर झालेल्या एकूण ४९ लाभार्थींना मोफत वाळू पासेस निर्गमित केलेल्या आहेत.

# आदिवासी विकास विभागातील गृहपाल (पुरुष/स्त्री) पदाच्या पदभरती मूळ कागदपत्रे पडताळणी ३० मे रोजी

## आदिवासी विकास आयुक्तालयाच्या https://tribal. maharashtra.gov.in या संकेतस्थळावर पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती-** अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग अमरावती विभागातील गृहपाल (पुरुष), गृहपाल (स्त्री) या पदाची मूळ दस्तावेज/कागदपत्र पडताळणी दि. ३० मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता अपर आयुक्त आदिवासी विकास अमरावती यांचे कार्यालय पोलीस आयुक्त कार्यालय जवळ, टीबी हॉस्पिटलच्या मागे अमरावती या ठिकाणी होणार आहे.त्यानुषंगाने कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनी ऑनलाईन सादर केलेला अर्ज व ऑनलाईन अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने सर्व मूळ दस्तावेज/कागदपत्रे व दोन सेट छायांकित प्रतीसह नमूद तारखेस व वेळेला उपस्थित रहावे, असे अपर आयुक्त तथा प्रादेशिक निवड समितीचे अध्यक्ष जितेंद्र चौधरी यांनी जाहीर सूचनेद्वारे कळविले आहे.

कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र ठरलेल्या (लेखी परीक्षेत ४५ टक्के गुण प्राप्त उमेदवार) उमेदवारांची यादी *आदिवासी विकास आयुक्तालयाच्या हींींिः//ींीळलरश्र. ारहरीरीहींीर.र्सेीं.ळप या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.* प्रसिद्ध केलेल्या यादीतील उमेदवारांचा समावेश म्हणजे आदिवासी विकास आयुक्तालयाद्वारे नोकरीची हमी नव्हे, याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी, असेही प्रादेशिक निवड समितीद्वारे कळविण्यात आले आहे.

# हुमणी किडीचे नियंत्रण करण्याची योग्य वेळ आली; करा हे सोपे उपाय

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**

अवर्षण परिस्थिती, पाण्याचा ताण, हवामानातील बदल, जैविक निविष्ठांचा कमी वापर आणि रासायनिक कीटकनाशकांचा बेसुमार वापर या प्रमुख कारणांमुळे ऊस पिकामध्ये हुमणी या किडीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे दिसून येत आहे.

वळवाचा (पहिला) पाऊस पडल्यानंतर होलोट्रॅकिया प्रजातीचे भुंगेरे जमिनीतून एकाच वेळी बाहेर पडतात आणि बाभुळ व कडूनिंबाच्या झाडावर जमा होतात.

प्रौढ भुंगेऱ्यांचे व्यवस्थापन

१) मशागतीय पद्धती

उन्हाळ्यामध्ये जमिनीची खोल नांगरट करावी.

नांगरणी केल्यानंतर उघडे पडलेले सुप्तावस्थेतील प्रौढ भुंगेरे वेचून रॉकेलमिश्रीत पाण्यात मिसळून त्यांचा नायनाट करावा.

पूर्ण कुजलेल्या शेणखताचा वापर करावा.

२) यांत्रिक पध्दती

झाडाच्या फांद्या हालवून खाली पडलेल्या भुगेन्याचा बंदोबस्त करावा.

प्रकाश सापळे वापरून प्रौढ भुंगेरे जमा करता येतात.

हे प्रकाश सापळे सर्व शेतकऱ्यांनी शेतामधील घर, झोपडी, विहीरीजवळ किंवा झाडावर लावावेत, सापळ्यात जमा झालेले भुंगेरे नष्ट करावेत. हे सापळे संध्याकाळी ७.३० ते ८.३० या कालावधीत लावावेत.

किटकनाशकांची फवारणी केलेल्या बाभूळ, कडुनिंब यांच्या फांद्या शेतामध्ये ठिकठिकाणी ठेवाव्यात.

रात्रीला भुंगेरे फांद्यावरील पाने खाल्यामुळे मरुन जातील.

अळीचे व्यवस्थापन

पिकामध्ये शक्य असेल तोपर्यंत आंतरमशागत करावी.

निंदणी आणि कोळपणी ही आंतरमशागतीची कामे केल्यास हुमणीच्या अळ्या पृष्ठभागावर येतात.

या अळ्या पक्षी वेचून खातात किंवा सुर्यप्रकाशाच उष्णतेमुळे मरतात.

आंतरमशागत करतेवेळी शेतातील अळ्या हाताने वेचून नष्ट कराव्यात.

खरिपातील पीक काढणीनंतर शेतामध्ये खोल नांगरट करावी व पाळी मारावी.

शेतामध्ये शक्य असल्यास वाहते पाणी द्यावे. त्यामुळे जमिनीतील अळ्या काही प्रमाणात मरतात.

शेतातील तणांचा बंदोबस्त करावा.

मेटाऱ्हायझियम एनिसोप्ली या उपयुक्त बुरशीचा १० किलो प्रति हेक्टर या प्रमाणात जमिनीतून वापर करावा.

हुमणीच्या अळीला रोगग्रस्त करणाऱ्या सुत्रकृमीचा वापर करावा.

भुंगेरे गोळा करून नष्ट करणे हे नियंत्रण उपायांमध्ये सर्वात प्रभावी व कमी खर्चाचे आहे.

तसेच यामुळे पुढील संक्रमण थांबविले जाते. सतत ३-४ वर्षे भुंगेरे गोळा करून मारावेत.

सामुदायिकरित्या भुंगेरे गोळा केल्यास हुमणी कीडीचा प्रादुर्भाव कमी होण्यास चांगली मदत होते.

अति प्रादुर्भावग्रस्त शेतात उसाचा खोडवा घेऊ नये.

पीक निघाल्यानंतर हुमणीग्रस्त शेताची मशागत रोटाव्हेटरने करावी.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष




शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बॅंकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




# झोपेतून उठल्या उठल्या चहा पिता? डॉक्टरांनी सांगितली चहा पिण्याची योग्य आणि चुकीची वेळ!

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**

भारतात चहा पिणाऱ्यांची काही कमी नाही. जास्तीत जास्त लोक सकाळी झोपेतून उठल्यावर गरमा गरम दुधाचा एक कप चहा पिणं पसंत करतात. कॉफी आणि हर्बल टी पिणाऱ्यांची संख्या अलिकडे वाढत असली तरी दुधाच्या चहासमोर हे काहीच नाही. काही लोक तर दिवसभरातून ५ पेक्षा जास्त कप चहा पितात. आता तर पावसाला सुरूवात झाली आहे. पावसाच्या सरी गरमागरम चहा आणि भजी खाण्याचा आनंद तर भरपूर लोक घेतात.

आयुर्वेद डॉक्टर दीक्षा भावसार यांनी त्यांच्या इन्स्टा अकाऊंटवर एक पोस्ट शेअर केली आहे. ज्यात त्यांनी लिहिलं की, भारतात तब्बल ६४ टक्के लोक रोज चहा पितात आणि त्यातील ३० टक्के लोक सायंकाळी चहा पितात. डॉक्टर लिहितात की, चहा पिणं ठीक आहे. पण चहा पिण्याची वेळही महत्वाची आहे. कोणत्याही वेळी चहा पिणं नुकसानकारक ठरू शकतं. अशात चहा पिण्याची योग्य वेळ आणि चुकीची वेळ कोणती हे जाणून घेऊ.

चहा पिण्याची चुकीची वेळ आणि पद्धत

डॉक्टर लिहितात की, उपाशीपोटी कधीही चहा पिऊ नये. असं केल्यानं शरीरात चिंता वाढवणारे कार्टिसोल हार्मोन रिलीज होतात. शरीरात सूज वाढण्याची धोका वढतो. तसेच पुढे जाऊन अल्सर होण्याची शक्यताही असते.

रात्री झोपण्याच्या काहीवेळ



आधी चहा पिणं टाळलं पाहिजे. यानं तुमची झोप खराब होऊ शकते. ज्यामुळे तुम्हाला वात, चिंता अशा समस्या होऊ शकतात.जर तुम्हाला ॲसिडिटी असेल तर तुम्ही चहा पिऊ नये. चहा नॅचरली आम्लीय असतो आणि यामुळे छातीत जळजळ होऊ शकते.

- जेवण करण्याआधी आणि जेवण केल्यावर लगेच चहा पिऊ नये. यानं अन्नातील पोषक तत्वांचं अवशोषण कमी होतं.

- आयर्न सप्लीमेंटसोबत कधीही चहा पिऊ नये. चहामधील टॅनिन आयर्नच्या अवशोषणात अडथळा निर्माण करतात. हे टॅनिन आयर्नमध्ये मिक्स होतात, ज्यामुळे शरीराला याला अवशोषित करणं अवघड होतं.

**चहा पिण्याची योग्य वेळ**


डॉक्टर सांगतात की, चहा सकाळी झोपेतून उठल्यावर साधारण २ तासानंतर प्यावा. तोही काहीतरी खाल्ल्यावर, पाणी प्यायल्यावर किंवा नाश्ता केल्यावर.

# सरकारी कामात अडथळा; आरोपीला सश्रम कारावास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती-** सरकारी कामात अडथळा निर्माण करणाऱ्या एकाला येथील जिल्हा न्यायाधीश तथा अप्पर सत्र न्यायालयाने मंगळवारी (दि. २७) एक वर्ष सश्रम कारावास, सहा हजार रुपये दंड व दंड न भरल्यास तीन महिने अतिरिक्त कारावासाची शिक्षा सुनावली आहे. ही घटना २५ जुलै २०२३ रोजी भातकुली ठाण्याच्या हद्दीतील चेचरवाडी येथे घडली होती. नीलेश कैलास देशमुख (३५, रा. चेचरवाडी) असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. न्यायालयात दाखल दोषारोपपत्रानुसार, महावितरणच्या खार तळेगाव येथील केंद्रात कार्यरत अजय दिलीप घाकडे (३२) व त्यांचे सहकारी यांनी घटनेच्या दिवशी चेचरवाडी येथे नीलेश देशमुखच्या घरासमोर जाऊन त्याला वीज बिल भरले का, अशी विचारणा केली.अजय भाकडे व त्यांचे सहकारी नीलेशच्या घरात वीजपुरवठा कोठून घेतला, हे पाहण्यासाठी गेले. त्यावेळी त्यांना घराजवळील खांबावर वायर टाकलेली दिसून आली. त्यावर नीलेशने अजय धाकडे व त्यांच्या सहकाऱ्यांना शिवीगाळ केली. लोखंडी रॉड घेऊन तो त्यांच्या अंगावर गेला. त्याने त्यांना धमकीसुद्धा दिली. या प्रकरणी अजय घाकडे यांनी भातकुली ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाअंती दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.या प्रकरणात साक्षीदारांची साक्ष व सरकारी पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने नीलेशला एक वर्ष सश्रम कारावास, ६ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास ३ महिने अतिरिक्त कारावासाची शिक्षा सुनावली.

# जनावरांची अवैध वाहतूक:एकास अटक, २३ जनावरांना केले मुक्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८मोर्शी -** अवैधरीत्या गोवंशांना निर्दयतेने कोंबून कत्तलीसाठी नेत असताना मोर्शी पोलिसांनी सिंभोरा ते नशिरपूर मार्गावर २३ जनावरे व दोन पीकअप व्हॅनसह एकूण १७ लाख ८१ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. कारवाईदरम्यान आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला. मात्र एका आरोपीला पकडण्यात पोलिसांना यश आले. सिंभोराहून मोर्शीकडे दोन पिकअप व्हॅनद्वारे कत्तलीसाठी जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती गोरक्षकांद्वारे मोर्शी पोलिसांना मिळाली होती. त्या अनुषंगाने मोर्शीचे ठाणेदार नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनात डीबी स्कॉडचे पोलिस उपनिरीक्षक अमोल बुरुकुल, शामसिंग चुंगड, स्वप्नील बायस्कर व छत्रपती करपते या चमूने सिंभोरा रोडवरील खुल्या कारागृहाजवळ नाकाबंदी केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पांढ्या रंगाच्या दोन बोलेरो पिकअप सिंभोराकडून मोर्शीकडे येत होत्या. त्या गाड्या थांबवण्याचा प्रयत्न केला असता त्यातील चालकांनी दोन्ही वाहन उलट दिशेला (सिंभोऱ्याकडे) वळवून पळण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पोलिसांनी त्यांचा पाठलाग करावा लागला. याच दरम्यान एका चालकाचे त्याच्या वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ते वाहन नालीमध्ये अडकले. त्याचवेळी मागच्या बोलेरो चालकाने वाहन थांबवून पळ काढला. दरम्यान पहिल्या वाहनातील चालकानेही पळ काढला. त्यामुळे उर्वरित क्लिनर सोहेलशाह जाबीर शाह (वय २४ रा. अमरावती) पोलिसांच्या हाती लागला. या



वाहनांची पाहणी केली असता बोलेरो क्रमांक एमपी ०४ जीबी २४८० मध्ये १३ गोवंश आढळली. तसेच नालीमध्ये अडकलेली बोलेरो क्रमांक एमएच १५ एफव्ही ५७५० यामध्ये १० गोवंश जनावरे मिळून आली.या कारवाईत एकूण २३ गोवंश जनावरे किंमत अंदाजे १ लाख ८१ हजार तसेच दोन्ही वाहन मिळून किंमत १६ लाख असा एकूण १७ लाख ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. २३ गोवंशांची गोरक्षण संस्था येरला येथे रवानगी केली. मोर्शीचे गोरक्षक पंकज पवार व अभिलाश व्यवहारे यांनी यासाठी सहकार्य केले. सर्व आरोपींविरुद्ध विविध कलमांन्वये मोर्शी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. २८ मे २०२५ शहर/ग्रामिण




# २ जुन रोजी श्रींच्या पालखीचे पंढरपूरीवारी करीता प्रस्थान

## आतुरता आषाढी वारीची..

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८शेगाव–** पंढरपूर येथील आषाढी एकादशी यात्रा महोत्सवात दरवर्षी श्रींची पालखी सहभागी होते. परंपरेनुसार यंदाही श्रीसंत गजानन महाराज संस्थानच्या वतीने श्रींची पालखी ज्येष्ठ शु.७ म्हणजेच दि.२ जून रोजी सकाळी ७ वाजता प्रस्थान करणार आहे. पंढरपूर येथील आषाढी एकादशी यात्रा महोत्सवात सहभागी होण्याचे संस्थानचे हे ५६ वे वर्ष आहे. श्रींच्या पालखीत जवळपास सातशे वारकऱ्यांसह, टाळकरी, वारकरी, पताकाधारी, हरीनामाच्या गजरात जय हरी विठ्ठल श्री हरी विठ्ठल नामाचा जप करीत संत नगरीतून पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे.

एकादशीला भूवैकुंठ पंढरपूरच्या विठोबाची महायात्रा आषाढी, कार्तिकी, चैत्र व माघी अशा चार एकादशीला पंढरपूरला भरते. जो नित्याने वारंवार पंढरपूरला जातो तो वारकरी होय. श्रीसंत गजानन महाराजांच्या पुनीत वास्तव्याने पावन झालेल्या शेगाव नगरीला विदर्भाचे पंढरपूर म्हणून गौरविल्या जाते. पंढरीनाथाच्या भेटीसाठी प्रत्यक्ष शेगावच्या योगी गजाननाने हजारो वारकऱ्यांसह वारी केल्याचे दाखले मिळतात. त्यामुळे येथील वारीला असलेली परंपरा ही संतांनी दाखविलेल्या मार्गावर गेल्या ५५ वर्षांपासून अव्याहतपणे जपली जात आहे. ज्येष्ठ शुद्ध ७, दि. २ जून रोजी महाराजांची पालखी विठूरायाच्या भेटीला मार्गस्थ होणार आहे. टाळ, मृदंग वाजत,गाजत, शेकडो वारकरी हातात भागवत धर्माची पताका व मुखी हरी नामाचा गजर करीत श्रींच्या पालखीसह पंढरीची वाट धरतात. श्रींच्या दिंडीमध्ये,पताकाधारी, गायक, मुंदगवादक, सेवेकरी अशा एकूण सातशे जणांचा समावेश असतो. या दिंडीमध्ये एक विणेकरी व स्वयंशिस्तीने टाळकरी व पताकाधारी चालत असतात. मजल दरमजल करत ठरलेल्या ठिकाणी मुक्काम, तेथे भजन, कीर्तन, प्रवचन करीत भागवत धर्म वाढवण्याचा प्रयत्न करतात. मार्गावरील अनेक छोट्या–मोठ्या गावांना आनंदात सहभागी होण्याचे भाग्य मिळते. दिवसभर वारी आणि रात्रीचा मुक्काम, मुक्कामाचे दिवस आणि गावे ठरलेली असतात. मुक्कामाच्या ठिकाणी सकाळी काकडा, हरीपाठ, रस्त्याने भजन, श्रीची आरती, प्रवचन आदी कार्यक्रम नित्य नियमाने रोज होतात.मजल दरमजल करत मुखी संताचे अभंग गात पाउले श्रद्धेने पंढरीकडे चालत असतात. पाऊस असो वा ऊन, वारा अथवा थंडी असो, चालताना विठ्ठल दर्शनाची ऊर्जा वारकऱ्यांना पुरेशी असते. प्रत्यक्ष श्रीसंत गजानन महाराजांची पालखी सोबत असल्याने जणू सर्व सुखाचेआगर सोबत असल्याची भावना असते.

तब्बल ३३ दिवसांचा पायी करून श्रींची पालखी आषाढ शु.९ म्हणजे ४ जुलै रोजी शुक्रवार पंढरपुरी येथे पोहोचणार आहे. पोहोचलेले वारकरी पंढरीच्या भूमीवर पाय ठेवण्यापूर्वी तेथील माती कपाळाला लावून जणू विठ्ठलमयच होऊन जातात.

> **दि.४ जुलै ते दि.९ जुलै पर्यंत श्री क्षेत्र पंढरपूर येथे श्रींच्या पालखीचा मुक्काम राहील.**
>
> **दि.१० जुलै २०२५ रोजी श्री क्षेत्र पंढरपूर येथुन श्रींच्यापालखी सोहळा निघून दि.३१ जुलै २०२५ वार गुरुवार रोजी संत नगरी शेगांव येथे दाखल होणार आहे.**



### असा असणार पालकीचा प्रवास

श्रींच्या पालखीचा पंढरपूर पायदळ प्रवास.दि.२ जुन रोजी श्री क्षेत्र नागझरी येथील संत गोमाजी महाराज संस्थानमध्ये महाप्रसादानंतर सायंकाळी अकोला जिल्ह्यातील पारस येथे श्रींच्या पालखीचा रात्रीचा मुक्काम राहील. ३ जुन रोजी पारस येथून गायगाव येथे तर रात्री भौरद येथे श्रींच्या पालखीचा मुक्काम राहील. त्यानंतर अकोला येथे ४ व ५ जुन असे दोन दिवस मुक्काम राहील. ६ जुन रोजी सकाळी भरतपूर–वाडेगाव, ७ जुन रोजी देऊळगाव (बाभूळगाव)–पातूर, ८ जुन मेडशी–श्री क्षेत्र डव्हा, ९ जुन मालेगाव– शिरपूर जैन, १० जुन चिंचापा पेन–म्हसला पेन, ११ जुन किनखेडा–रिसोड, १२ जून पानकन्हेरगाव–सेनगाव, १३ जुन श्री क्षेत्र नरसी (नामदेव) – डिग्रस, १४ जून श्री क्षेत्र औंढा नागनाथ–जवळा बाजार, १५ जुन हट्टा (अडगांव रंजोबा) श्री क्षेत्र त्रिधारा, १६ जुन परभणी–परभणी, १७ जून ब्राह्मणगाव दैठणा, १८ जुन खळी – गंगाखेड, १९ जुन वडगाव (दादा हरी) परळी (थर्मल), २० जुन परळी–परळी वैजनाथ, २१ जुन कन्हेरवाडी– अंबाजोगाई, २२ जुन लोखंडी सावरगाव – बोरी/सावरगाव, २३ जुन गोटेगाव – कळंब, २४ जुन गोविंदपूर – तेरणा सा. कारखाना, २५ जुन किनी – उपळा (माकडाचे), २६ जुन श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर (धाराशिव) धाराशिव, २७ जुन वडगाव सिद्धेश्वर–श्री क्षेत्र तुळजापूर, २८ जुन सांगवी, ऊळे, २९ जुन सोलापूर, सोलापूर, ३० जुलै सोलापूर – सोलापूर, १ जुलै सोलापूर, तिन्हे, २ जुलै कामती खु. (वाघोली) माचनूर, ३ जुलै ब्रह्मपुरी, श्री क्षेत्र मंगळवेढा, ४ जुलै श्री क्षेत्र मंगळवेढा व रात्री श्री क्षेत्र पंढरपूर येथे श्रींची पालखी पोहचणार आहे.

# जिल्हा परिषदेला २० लाख रुपयांचा यशवंतराव चव्हाण पंचायत पुरस्कार

### राज्यपालांच्या हस्ते मुंबईत सन्मान; पुरस्कार रकमेचे लवकरच नियोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती**

पंचायत राज अभियानात उत्कृष्ट काम केल्याबद्दल येथील जिल्हा परिषदेला २० लाख रुपयांचा यशवंतराव चव्हाण पंचायत राज पुरस्कार प्राप्त झाला आहे. जिल्हा परिषदेच्या सीईओ संजीता महापात्र व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मुंबई येथे आयोजित एका कार्यक्रमात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला. दरम्यान, या रकमेतून विकासात्मक कामाला गती द्यायची असली तरी नेमके कोणते काम करायचे, हे येत्या काही दिवसांत निश्चित केले जाणार आहे.

हा पुरस्कार सन २०२३–२४ साली झालेल्या उत्कृष्ट कामकाजासाठी देण्यात आला आहे. तो राज्यस्तरीय असून सर्व जिल्ह्यांच्या कामगिरीवर मात करीत राज्यात दुसरे स्थान प्राप्त केल्यामुळे मिळाला आहे. वितरणावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, याच विभागाचे राज्यमंत्री योगेश कदम तसेच ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले उपस्थित होते. मुंबईच्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये सकाळी साडे १० वाजता हा कार्यक्रम सुरू झाला. पंचायत राज अभियानामध्ये अमरावती जिल्हा परिषदेने उत्कृष्ट कार्य केले आहे. दरम्यान, या पुरस्कारामुळे जिल्हा परिषदेचे सर्व कर्मचारी आनंदले असून त्यांनी यापूर्वीच सीईओंचा सत्कारही केला आहे. जिल्हा परिषद ही जिल्ह्याचा एकूणच विकास नियंत्रीत करणारी यंत्रणा आहे. या यंत्रणेच्या माध्यमातूनच प्रत्येक तालुक्याच्या सर्वांगीण विकासाची आखणी केली जाते. सन २०२३–२४ साली ही दोन्ही कामे अगदी चोखपणे करण्यात आल्याने शासनाने हा पुरस्कार दिला आहे.

सन २०२३–२४ मध्ये जिल्हा परिषदेने आरोग्य, शिक्षण, कृषी, पशुसंवर्धन, समाज कल्याण, बांधकाम अशा सर्वच विभागात उत्कृष्टतेची मोहोर उमटविली. याशिवाय डीआरडीएच्या माध्यमातून घरकुलांची कामेही मोठ्या प्रमाणात पुढे नेली. या सर्व कामगिरीची दखल शासनाने घेतली असून त्यासाठीच हा पुरस्कार देण्यात आला आहे. यावेळी जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या (डीआरडीए) प्रकल्प संचालक प्रिती देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस, सहायक आयुक्त (विकास) तुकाराम टेकाळे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. पुरुषोत्तम सोळंके आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांना विशेष निमंत्रण हा पुरस्कार सन २०२३–२४ यावर्षी झालेल्या सर्वंकष विकास कामांसाठी देण्यात आला आहे. त्यावेळी अविश्यांत पंडा हे जिल्हा परिषदेचे सीइओ तर तुकाराम टेकाळे उपमुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. सध्या पंडा हे गडचिरोलीचे जिल्हाधिकारी आणि टेकाळे हे सहायक आयुक्त आहेत. त्यामुळे या दोन्ही अधिकाऱ्यांनादेखील सदर कार्यक्रमासाठी विशेषत्वाने निमंत्रित करण्यात आले होते.

# जिल्हा परिषद निवडणुकीचा कार्यक्रम लवकरच

### सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर तीन आठवडे उलटले; जागांच्या संख्येबाबत निर्णय प्रलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती**

येत्या काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकीबाबत नागरिकांची उत्सुकता शिगेला पोचली आहे. चार आठवड्यात निवडणूक कार्यक्रम आणि चार महिन्यात निवडणुका घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने गेल्या ६ मे रोजी दिले. हा कालावधी संपुष्टात यायला आता केवळ एक आठवडा शिल्लक आहे. परंतु तीन आठवड्यांचा कालावधी उलटल्यानंतरही अद्याप निवडणूक कार्यक्रमाबाबतची स्पष्टता पुढे आली नाही. सूत्रांच्या मते येत्या एक–दोन दिवसांत याबाबतची स्पष्टता होण्याची शक्यता आहे.



अमरावतीवासियांसाठी याहीपेक्षा उत्सुकतेचा मुद्दा जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या एकूण जागांचा आहे. जिल्ह्यात पूर्वी ५९ जागा होत्या. दरम्यानच्या काळात राज्य शासनाच्याच निर्देशाने त्या ६६ पर्यंत वाढविण्यात आल्या. सन २०२२ साली झालेल्या या सुधारणेनंतर त्या ६६ मतदारसंघासाठीचे आरक्षणही ठरविण्यात आले. परंतु पुढे ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर अमरावतीसह राज्यातील सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका थांबविण्यात आल्या. त्यामुळे येत्या काळात होणारी जिल्हा परिषदेची निवडणूक ५९ जागांसाठी की ६६ जागांसाठी या निर्णयाची सर्वांनाच प्रतीक्षा लागली आहे. त्यासाठी ग्रामविकास विभागाने जिल्हा प्रशासनामार्फत पंचायत समितीनिहाय (तालुका) लोकसंख्येची माहिती मागविली आहे. विशेष म्हणजे स्थानिक जिल्हा प्रशासनाने ही माहितीसुद्धा त्यांच्याकडे पाठवली आहे. परंतु अद्यापही यासंदर्भातील अंतिम निर्णय पुढे आला नाही.

काय आहे ६ मे रोजीचा निर्णय?


ओबीसी आरक्षणाबाबतचा अंतीम निर्णय होईस्तोवर न थांबता चार आठवड्यात निवडणूक कार्यक्रम जाहीर करुन चार महिन्याच्या आत निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समित्या, महापालिका, नगरपालिका व नगरपंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रशासकीय तयारी सुरु झाली आहे. या पार्श्वभूमीवर येथील जिल्हा परिषद निवडणूक विभागही सक्रीय झाला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार २०१७ साली जी आरक्षणाची स्थिती होती, त्या सूत्रानुसार या निवडणुका घ्यायच्याा आहेत.

### २०२२ मध्ये संपला कार्यकाळ

जिल्हा परिषदेच्या तत्कालीन पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ मार्च २०२२ मध्ये संपुष्टात आला. नियमानुसार त्यापूर्वीच सार्वत्रिक निवडणूक घेतली जाणार होती. तशी तयारीही राज्य शासन व निवडणूक आयोगाने केली होती. दरम्यानच्या काळात २०२१ च्या जनगणनेनुसार निवडणूक घेतली जावी, असे राज्य शासनाला वाटले. त्यामुळे जिल्हा परिषदेमध्ये ७ मतदारसंघांची वाढ झाली असून एकूण संख्या ५९ वरुन ६६ वर पोहोचली आहे. परंतु याच काळात ओबीसी आरक्षणाचा मुद्दा तापल्याने निवडणुका होऊ शकल्या नाहीत. तेव्हापासून येथील कारभार प्रशासकांच्या हाती आहे.

# अमरावतीचा जितेश शर्मा आरसीबीचा कर्णधार

## आयपीएलमध्ये सलग ३ सामन्यात नेतृत्त्व




विदर्भ प्रजासत्ताक

दि.२८अमरावती १०

अमरावतीचा यष्टिरक्षक फलंदाज जितेश शर्माकडे इंडियन प्रीमियर लीगमधील (आयपीएल) संघ रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे (आरसीबी) कर्णधारपद सोपवण्यात आल्यामुळे शहरातील क्रिकेटप्रेमींमध्ये उत्साह वाढला आहे. आरसीबीसारख्या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत अमरावतीकर क्रिकेटपटूने एखाद्या संघाचे कर्णधारपद भूषवणे ही शहरवासीयांसाठी अभिमानाची बाब असल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत. विशेषत: श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळातील क्रिकेट स्टेडियमवर जितेश घडला तेथे उत्साहाचे वातावरण आहे.

आयपीएलच्या प्रारंभिक सामन्यांमध्ये रजत पाटीदारकडे आरसीबीचे नेतृत्त्व राहिले. विशेष म्हणजे स्टार फलंदाज विराट कोहलीही याच संघातील सदस्य आहे. मात्र, अचानक आरसीबी संघ व्यवस्थापनाने रजत पाटीदारला इम्पॅक्ट प्लेअर घोषित करून कर्णधारपदाची जबाबदारी जितेशकडे सोपवली. त्यामुळे अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला तसाच अमरावतीकरांसाठीही हा सुखद धक्का होता. जितेश हा जेवढा आक्रमकपणे फलंदाजी करतो, तेवढाच स्वभावाने शांत आहे. त्यामुळे तो संघाला व्यवस्थित सांभाळू शकतो, असे आरसीबी संघ व्यवस्थापनाला वाटले असावे.नुकताच त्याला राज्य शासनाचा प्रतिष्ठेचा शिव छत्रपती क्रीडा पुरस्कारही देण्यात आला. जितेशला आरसीबीचे कर्णधारपद मिळाल्यामुळे त्याचे प्रशिक्षक डॉ. दीनानाथ नवाथे यांना कमालीचा आनंद झाला.

# फिनले मिलच्या कुशल कामगारांच्या जीवनात वनवास; रोजगाराच्या प्रतीक्षेत अचलपूर फिनले मिल कामगार

## खर खडतर परिस्थितीचा करावा लागतो सामना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अचलपूर :** –कोरोना महामारीला पाच वर्षे पूर्ण झाली, मात्र अचलपूरमधील शेकडो कामगारांचे आयुष्य अजूनही ठप्प आहे. अचलपूरमधील एकमेव रोजगाराचं साधन असलेली ‘फिनले टेक्स्टाईल मिल’ अजूनही बंद असून, या मिलमधील कुशल कामगारांनी आता मोलमजुरी करण्याची वेळ आली आहे. हातात कौशल्य असूनही या कामगारांना आपले कुटुंब चालविण्यासाठी खडतर परिस्थितीचा सामना करावा लागत आहे.

**कामगारांची वेदना – बकाया वेतन नको, पण मिल सुरू करा–** कोरोना काळात बंद करण्यात आलेली फिनले मिल आजही बंदच आहे. २०२१ मध्ये कामगारांनी सलग ३ महिने ११ दिवस आंदोलन केले. त्यानंतर मंत्री बावनकुळे यांच्या हस्ते तत्कालीन कपडा मंत्री स्मृती इराणी यांच्याकडे निवेदन देण्यात आले. त्यावेळी काही काळासाठी मिल सुरू करण्यात आली होती, मात्र एप्रिल २०२१ मध्ये पुन्हा ‘कच्चा माल उपलब्ध नाही’ या कारणावरून ती बंद करण्यात आली. स्थानिक स्तरावर पुरेशा प्रमाणात कापूस उत्पादन होत असतानाही कच्च्या मालाच्या अभावाचे कारण पुढे करून कामगारांची फसवणूक करण्यात आली आहे. या मुद्यावर केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांच्याशी चार वेळा चर्चा झाली, मात्र प्रत्येक वेळी तारीख पुढे ढकलण्यात आली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी देखील या बाबतीत लक्ष घातले, परंतु ‘२३ मिल्स’ प्रकरणाचा हवाला देत फिनले मिल सुरू होऊ शकत नाही असे सांगण्यात आले. त्यानंतर नवनीत राणा व रवि राणा यांच्या माध्यमातून वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांच्याशी चर्चा झाली आहे.



शब्दात व्यक्त करता येणार नाही अशी अवस्था – विश्वनाथ गौड

फिनले मिलमध्ये फिटर विथ जॉबर पदावर कार्यरत असलेल्या विश्वनाथ मधुसुदन गौड यांनी सांगितले की, माझ्या हाताखाली ३० कामगार होते. मी मशीन चालू स्थितीत ठेवण्याचं काम करायचो. पण आज मी ठेकेदारासोबत मोलमजुरी करतोय. पीएफ कटल्यामुळे दुसरीकडे नोकरी करताना अडचणी येत आहेत. कंपनीने अप्रत्यक्षपणे राजीनामा मागितला आहे, मात्र ते दिल्यास आपली वर्षानुवर्षांची मेहनत वाया जाईल अशी चिंता त्यांनी व्यक्त केली.

वार्निंग मशीन ऑपरेटर म्हणून काम करणारे आकाश रमेशराव जामनेकर म्हणाले, आमचं सहा लोकांचं कुटुंब आहे. माझा लहान भाऊ व मी दोघं कमावते आहोत. एक दिवस काम असतं तर दुसऱ्या दिवशी नाही. छोट्या भावाचं लग्न देखील रखडले आहे. इतक्या कमी उत्पन्नात कुटुंब चालवणं कठीण झालं आहे.

### २१ कोटींची मंजूरी पण निधी अडकला कुठे?

सह्याद्री अतिथिगृहात झालेल्या बैठकीत महाराष्ट्र शासनाकडून फिनले मिलसाठी २१ कोटी रुपये मंजूर झाले. मात्र हा निधी अद्यापही मिळालेला नाही. फिनले मिल पुन्हा सुरू करण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी फिनले मिलमधील फिटर राजा ठाकूर यांनी केली आहे.

### आत्महत्येच्या विचारांपर्यंत मजल गेली आहे – ऋषिकेश अपाले

फिनले मिलमध्ये २०१६ पासून सायडर मशीन ऑपरेटर म्हणून कार्यरत असलेले ऋषिकेश प्रकाशराव अपाले म्हणाले, काम बंद असल्याने मी सध्या दाल मिलमध्ये हमाली करतो. घरात चार लोक आहेत आणि उत्पन्न नाही. दिवाळीपासून अर्ध वेतन सुद्धा मिळालं नाही. इतक्या वाईट परिस्थितीत काही वेळा आत्महत्येचे विचार मनात येतात.

# शालार्थ आयडी घोटाळ्यात दीडशेहून अधिक संस्थांचे 'कनेक्शन'

## प्रत्येक संस्थेची सखोल चौकशी सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८नागपूर :**
संपूर्ण राज्याला हादरविणाऱ्या शालार्थ आयडी घोटाळ्यात 'एसआयटी'कडून वेगाने तपास सुरू आहे. अटकेत असलेल्या नागपूर शिक्षण विभागाच्या माजी उपसंचालक व छत्रपती संभाजीनगर विभागीय शिक्षण मंडळाच्या सचिव वैशाली जामदार तसेच नागपूर विभागीय मंडळाचे अध्यक्ष चिंतामण वंजारी यांच्या सखोल चौकशीतून या घोटाळ्यात आणखी अधिकाऱ्यांची नावे समोर आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. दरम्यान, आतापर्यंत या घोटाळ्यात दीडशेहून अधिक शैक्षणिक संस्थांचे 'कनेक्शन' समोर आले आहे.



शालार्थ आयडी घोटाळ्याची व्याप्ती पूर्व विदर्भासोबतच इतर ठिकाणीदेखील आहे का याचा एसआयटीकडून तपास सुरू आहे. एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार एसआयटीने २०१० पासूनच्या शालार्थ आयडीसंदर्भात तपास केला. नागपूर जिल्ह्यात जवळपास अकराशे प्रस्ताव तयार झाले होते. मात्र त्यातील केवळ साडेतीनशेच शालार्थ आयडीचे प्रस्ताव पडताळणी समितीकडे गेले. त्यांची छाननी झाली व ते अधिकृत ठरले. आतापर्यंतच्या तपासात ६२९ शालार्थ आयडी बोगस असल्याचे आढळून आले आहे. जवळपास दीडशे शिक्षणसंस्थांच्या शिक्षकांचे हे आयडी होते. त्या संस्थांचीदेखील चौकशी सुरू झाली आहे.

दरम्यान, एसआयटीने वंजारी, जामदार यांच्यासोबतच लिपिक मंघामचीदेखील सविस्तर चौकशी केली. शालार्थ आयडी तयार करणे, शासकीय नियुक्ती मिळणे व वेतन काढणे अशी ही प्रक्रिया होती. शिक्षणाधिकाऱ्यांकडून उपसंचालक कार्यालय व तेथून पडताळणी समितीकडे प्रस्ताव जाणे अभिप्रेत होते. मात्र आतापर्यंत ६२९ शालार्थ आयडी हे प्रस्ताव समितीकडे न पाठविता थेट जारी झाल्याची बाब समोर आली आहे. यात उपसंचालक, शिक्षणाधिकाऱ्यांसोबतच काही निरीक्षक, लिपिक, अधीक्षक यांचादेखील समावेश असल्याचे आढळले आहे. या सर्वांवर एसआयटीकडून कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती उपायुक्त राहुल मदने यांनी दिली.

### नीलेश वाघमारे फरारच

दरम्यान, या प्रकरणातील महत्त्वाचा दुवा असलेला वेतन विभाग अधीक्षक नीलेश वाघमारे हा फरारच आहे. त्याचा एसआयटीकडून शोध घेण्यात येत आहे. त्याने अगोदर पोलिसांना गुंगारा दिला होता. तो गोव्यात लपल्याच्या चर्चा होत्या. मात्र त्यात काहीही तथ्य नसल्याची बाब एसआयटीतील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केली आहे. त्याला लपण्यास मदत करणाऱ्यांवरदेखील कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

# बेसहारा व्यक्तीवर धामणगावमध्ये अंत्यसंस्कार

## धनराज उर्फ धनसिंग वहिले यांच्यावर अंत्यसंस्कार करणाऱ्यांचे होतेय कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८धामणगाव रेल्वे**
रस्त्यावर भीक मागून जगलेले आयुष्य पण त्या व्यक्तीचा अंत्यसंस्कार असा झाला की भल्या-भल्यांच्या वाट्यालाही तसा सन्मान येणार नाही. या घटनेतून धामणगाववासीयांनी जपलेली माणुसकी दिसून आली. शिवाय सामाजिक बांधिलकीचे एक उत्तम उदाहरणही त्यातून पुढे आले.गावाकडून शहराकडे अनवाणी पावलानी पोहोचलेल्या एका व्यक्तीची ही संघर्षमय जीवनगाथा आहे. धनराज विठोबाजी वहिले उर्फ धनसिंग ठाकूर असे या व्यक्तीचे नाव.



या ७० वर्षीय व्यक्तीचे दोन दिवसांपूर्वी येथील ग्रामीण रुग्णालयात निधन झाले. गुंजी हे मूळगाव असलेल्या धनसिंग ठाकूर यांचे कोणतेही नातेवाइक त्यानंतर पुढे आले नाही. त्यामुळे त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. परंतु येथील सहृदयी नागरिकांनी एकत्र येत हा प्रश्न सोडवला. विशेष म्हणजे सर्व मंडळी या व्यक्तीला फार आधीपासून ओळखत होती आणि त्यांच्याबद्दल कणवही होती. धनसिंग ठाकूर यांची लढाई केवळ पोटासाठी होती. रस्त्याच्या कडेला फिरताना किंवा चौकाचौकांत भीख मागताना या शांत, निर्विकार चेहऱ्याने अनेकांच्या हृदयात स्थान मिळवले होते.

हा व्यक्ती 'हे विश्वचि माझे घर' या भावनेने रस्त्यावर अर्धनग्न अवस्थेत जगला. दरम्यान गेल्या काही दिवसांपासून या वृद्धाची प्रकृती अत्यंत खालावली होती. एक डोळा निकामी झाला होता. शरीरात तापही मुरला होता. अशा स्थितीत कृषीरत्न सच्चिदानंद काळे यांच्या पुढाकाराने दोन-तीन होतकरू तरुणांनी त्यांना येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. डॉ. मुबश्शीर अहमद यांनी त्यांच्यावर उपचारही केले. मात्र उपचारादरम्यान रात्री १०.३० वाजता त्यांची प्राणज्योत मालवली.

त्यामुळे सच्चिदानंद काळे यांच्यासह मातोश्री फाउंडेशन मंगरूळ दस्तगीरचे संचालक उमेश भुजाडणे, सुरेशराव शिरभाते स्मृती प्रतिष्ठानचे विनय शिरभाते, पत्रकार बोधिसत्व काळे, आशिष काळबांडे, वसंतराव देशमुख, प्रवीण इंगळे, पोलिस कर्मचारी अतुल पाटील व पुंडलिक चव्हाण यांनी पुढाकार घेत येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार केले.

# शाळाबाह्य सर्वेक्षणास मुहूर्त मिळेना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती-**
बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क (आरटीई) कायदा लागू असताना शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी न त्यांना शाळेत प्रवेश देण्याची उद्देशाने कार्यवाही करण्यात येते. या उद्देशाने दगडखाणी, वीटभट्टी, बाजारपेठा, पदपथ, कामगार बसाहती अशा ठिकाणी शिक्षकांकडून ६ ते ८ ती क्योगटातील मुलांचे सर्वेक्षण केले जाते. यंदा मात्र एप्रिलअखेरपर्यंत शाळा सुरू असल्याने तसेच मे महिना त संपत आला असताना, शालाबाह्य जी मुलांचे सर्वेक्षण कधी होणार, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. मागील दोन-तीन वर्षांपूर्वी कोरोनामुळे शाळा बंद होत्या. त्या काळात स्थलांतराचे प्रमाण वाढत होते. त्यामुळे शाळेत प्रत्यक्ष दाखल झालेली मुले यांचा शोध घेण्याची मोठी धावपळ करावी लागली होती. यंदाही शाळांच्या उन्हाळी सुट्ट्या मर्यादित असल्यामुळे एप्रिल अखेर पर्यंत शाळा सुरू होत्या. सर्वसाधारणपणे शासनाकडून एप्रिल ते मे या कालावधीत शालाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले जातात. त्यानुसार उन्हाळ्यात शिक्षण विभागामार्फत लोकवस्तीतील, भटक्या बांधकाम प्रकल्पावरील मजुरांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जातो.

### शाळाबाह्य मुले कुठली?

शहरात बाहेर जिल्ह्यातील कुटुंब विविध व्यवसायाच्या निमिताने स्थलांतर करीत असतात. हे कुटुंबीय आर्थिक स्तर निम्न असलेल्या वंचित घटकात असतात. या स्थलांतरामुळे मुलांच्या शिक्षणात या खंड पडण्याची समस्या निर्माण होते.

# कर्जमुक्ती झाल्याशिवाय आंदोलन संपणार नाही

## रविकांत तुपकर, सिंदखेडराजा येथे शेतकऱ्यांचा एल्गार




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८सिंदखेडराजा**
विदर्भातील दौऱ्याची सुरुवात माँ जिजाऊंना करून करत आहोत. सरकारने निवडणुकीत दिलेली आश्वासने पाळावीत. निवडणुकीत मुख्यमंत्री यांनी हातवारे करत म्हणाले होते की, सातबारा कोरा करू आता कर्ज भरल्याशिवाय बँक पीक कर्ज देत नाही हे खपून घेतले जाणार नाही. महाराष्ट्रातला प्रत्येक शेतकरी कर्जमुक्त झाल्याशिवाय आंदोलनाचे युद्ध संपणार नाही, असा इशारा क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी शासनाला दिला.

सिंदखेडराजा येथे क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे वतीने कर्जमुक्तीसाठी रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात २७ मे रोजी स्थानिक नगर परिषद टाऊन हॉलमध्ये एल्गार मेळावा पार पडला. यावेळी शेतकरी या एल्गार मेळाव्याला उपस्थित होते.

सुरुवातीला तहसील कार्यालयासमोरून मोठी रॅली काढण्यात आली व जिजाऊंना अभिवादन करण्यात आले. रॅलीचे रूपांतर सभेत झाले. यावेळी सभेला संबोधित करताना तुपकर बोलत होते. यावेळी तुपकर यांनी थेट झालेल्या लोकसभा निवडणुकीचे गणिते मांडत विरोधी उमेदवारांवर टीका केली. तुपकर म्हणाले की, संघटनेचे जाळे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात विणले गेले आहे. शासनाने दिलेल्या आश्वसनांची पूर्तता करून शेतकऱ्यांना संपूर्ण कर्ज माफी द्यावी व सक्तीची कर्ज वसुली थांबवावी. सरसकट पीक विमा देण्यात यावा, भाववाढीचा फरक देण्यात यावा, पाणंद रस्ते, वन्यप्राणी यांच्यापासून होणारे नुकसान थांबवावे अशा अनेक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मोठे आंदोलन करण्याचे इशारा त्यांनी दिला. पीक विमा व कर्ज मुक्तीसाठी हायकोर्टात जाऊ, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. या कार्यक्रमाला ड. शर्वरी तुपकर,राजू कसबे, राजाराम जाधव, बाळूभाऊ शेवाळे, कैलास मेहेत्रे, आजिनाथ वानखेडे, शिवहरी वाघ, लक्ष्मण मोरे हे होते. प्रास्ताविक अश्विनी मेहेत्रे यांनी केले.

# वसतिगृहातील समस्या:प्रहारची इतर मागास बहुजन कल्याण विभागात धडक

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२८अमरावती १२
शहरातील इतर मागास बहुजन कल्याण विभाग अंतर्गत येणाऱ्या मुलांचे कॉटन मार्केट रस्त्यावरील वसतिगृहातील विद्यार्थ्यांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर प्रहार जनशक्ती पक्ष आक्रमक झाला आहे. मंगळवारी दुपारी प्रहार महानगर प्रमुख बंटी रामटेके यांच्या नेतृत्वात इतर मागास बहुजन कल्याण विभागावर धडक देत प्रादेशिक उपसंचालकांना निवेदन देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या समस्या निकाली काढाव्या अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.



वसतिगृहात विद्यार्थ्यांच्या गैरसोयी संदर्भातील तक्रार तेथील विद्यार्थ्यांकडून प्रहारला मिळाली होती. वसतीगृहाच्या एका खोलीत ८ ते १० विद्यार्थी राहतात, खोलीत हवा यायला आवश्यक खिडक्या नाहीत. एकाही खोलीत कूलर नाही. पावसामुळे खोलीची आणि बाथरूमची सीलिंग गळते. पावसाचे पाणी पाइपद्वारे खाली येऊन खोलीत घुसत आहे. विद्यार्थ्यांना अभ्यास सोडून खोलीत घुसलेले पाणी बाहेर काढावे लागत आहे. त्यांना झोपायलाही जागा राहत नाही. यासारख्या अनेक समस्या विद्यार्थ्यांना असल्याचे प्रहारचे महानगर प्रमुख बंटी रामटेके यांनी सांगितले आहे. संबंधित विभागाला वारंवार निवेदने दिली मात्र, त्यांच्या एकाही समस्येचे निवारण झाले नाही. दरम्यान प्रहारच्या पदाधिकाऱ्यांनी वसतिगृहाला भेट देऊन पाहणी केली असता तेथील विद्यार्थ्यांचे हाल होत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे आगामी काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा प्रहारचे जिल्हाध्यक्ष छोटू महाराज वसू यांनी दिला आहे.

या वेळी संपर्क प्रमुख गोलू पाटील, युवक आघाडी अभिजित देशमुख, जिल्हा महासचिव शेख अकबर, शहर महासचिव अभिजित गोंडाणे, शहर संघटक श्याम इंगळे, मनीष पवार, शेषराव धुळे, विक्रम जाधव, अजय तायडे, नंदू वानखडे, कुणाल खंडारे यांच्यासह अनेक विद्यार्थी उपस्थित होते.या आहेत वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या मागण्या विद्यार्थ्यांची इमारत बदलावी, जीआरमधील सर्व सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्याव्या, अभ्यासिका उपलब्ध करून द्यावी. ड्रेनेज सिस्टिमची व्यवस्था करावी. इमारतीचे व्हेंटिलेशन बरोबर करावे, वसतीगृहाच्या इमारत परिसरातील ध्वनिप्रदूषणावर पर्यायी मार्ग काढावा. पावसाचे पाणी साचल्याने विविध आजार होत आहेत यावर तत्काळ उपाययोजना करावी, पार्किंग व्यवस्था करण्यात यावी.

# दिग्रसचे ३६ मुस्लीम बांधव पवित्र हज यात्रेसाठी रवाना

## मित्र, नातेवाईक, हिंदू बांधवांकडूनही शुभेच्छा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८दिग्रस-** दिग्रस येथून आज २७ मे २०२५ रोजी सकाळी १० वाजता ३६ मुस्लीम बांधवांची पवित्र हजयात्रेसाठी रवानगी झाली. असंख्य मित्र, नातेवाईक व इतर बांधवांनी त्यांना भावपूर्ण निरोप दिला. यावेळी हिंदू बांधवांकडूनही त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.दिग्रस येथून ३६, तर यवतमाळ जिल्ह्यातून एकूण २५० पेक्षा अधिक मुस्लीम बांधवांची पवित्र हजयात्रेसाठी यावर्षी वर्णी लागली आहे. यापैकी अधिकतर लोक हज कमिटीकडून नागपूर येथून थेट जेद्दाह जाणार आहे, तर काही जण खाजगी टूर्सद्वारे मुंबई येथून जाणार आहे. यंदा हजयात्रेकरूंसाठी केवळ यवतमाळ व दिग्रस या दोन ठिकाणीच लसीकरणाची



व्यवस्था करण्यात आली होती. दिग्रस येथे तीन-चार वेळा जिल्हास्तरीय हज प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा हज प्रशिक्षक मुहम्मद रशीद तसेच जिल्हा हज समनवयक हाजी एजाजुद्दीन यांनी विस्तृत माहिती देऊन त्यांना मार्गदर्शन केले. हज कमिटीतर्फे तयार करण्यात आलेल्या माहितीपत्रक, पुस्तके व इतर साहित्याचा देखील उपयोग प्रशिक्षणादरम्यान करण्यात आला होता. दिग्रस तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष पी. पी. पप्पूवाले, पत्रकार अजीम खान उपस्थित होते.

# उपजिल्हा रुग्णालयातील ३५ लाखांची 'सोयम एटीएम हेल्थ मशीन' धुळखात

## वैद्यकीय अधीक्षकांच्या मनमानीमुळे रुग्णांचे हाल हेल्थ मशीन सुरू करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अचलपूर :-**
अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणारी, तब्बल ३५ लाख रुपये खर्चून शासनाकडून पुरवलेली 'सोयम एटीएम हेल्थ मशीन' सध्या रुग्णालयाच्या परिसरात कचऱ्यात पडलेली आहे. ही धक्कादायक स्थिती वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेंद्र ढोले यांच्या मनमानी कारभारामुळे निर्माण झाली असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

या हेल्थ एटीएम मशीनचे उद्घाटन माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या हस्ते मोठ्या थाटात करण्यात आले होते. या मशीनविषयी अनेक वर्तमानपत्रांतून जाहिरातबाजी करत एकाच ठिकाणी १०० हून अधिक तपासण्या होणारी क्रांतिकारी यंत्रणा म्हणून प्रचार करण्यात आला होता. मात्र, सध्या ही यंत्रणा पूर्णतः दुर्लक्षित असून कचऱ्यामध्ये पडून धूळखात आहे.

रुग्ण व नागरिक वंचितया मशीनच्या माध्यमातून रक्तदाब, रक्तातील साखर, हृदयाची धडक, तापमान, ईसीजी, हिमोग्लोबिन, ऑक्सिजन लेव्हल अशा अनेक तपासण्या फक्त काही सेकंदांत करता येणे शक्य होते. यामुळे रुग्णांना वेळ आणि पैसे दोन्हींची बचत



होणार होती. पण मशीन निष्क्रिय असल्याने रुग्णांना खासगी लॅबमध्ये महागड्या तपासण्यांसाठी जाण्याची वेळ येत आहे.

शासनाचा निधी वायाशासनाने आरोग्य सेवेत सुधारणा व्हावी म्हणून मोठ्या अपेक्षेने हे यंत्र दिले होते. मात्र, प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे आणि वैद्यकीय अधीक्षकांच्या उदासीनतेमुळे ३५ लाखांचा निधी वाया जाण्याची शक्यता आहे. आरोग्य खात्याचे दुर्लक्ष आणि जबाबदार अधिकाऱ्यांचा हलगर्जीपणा यामुळे शासनाच्या उपक्रमाची वाट लागली आहे.

नागरिकांची संतप्त प्रतिक्रियाया प्रकरणावरून नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे. सरकारने दिलेले हे यंत्र रुग्णसेवेसाठी वापरात आणण्याऐवजी कचऱ्यात टाकले जात आहे, ही अत्यंत लाजीरवाणी बाब आहे, असे नागरिकांनी सांगितले. त्यांनी हे यंत्र त्वरित पुन्हा सुरु करून जनतेच्या सेवेसाठी वापरण्याची मागणी केली आहे.

कारवाईची मागणीस्थानिक सामाजिक कार्यकर्ते आणि आरोग्यप्रेमींनी जिल्हाधिकारी आणि आरोग्य विभागाकडे लक्ष वेधून घेत वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेंद्र ढोले यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# शेतकऱ्यांनी लोकवर्गणीतून बांधले बंधारे युवा शेतकऱ्याचा पुढाकार, पाणीटंचाईवर शोधला उपाय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८चांदुर बाजार**

चांदूरबाजार तालुक्यात मोठ्याप्रमाणावर संत्रा क्षेत्र आहे. तालुक्यात गेल्या काही वर्षात अनियमित पावसामुळे सिंचनाची समस्या व वाढते उष्णतामान यामुळे भीषण दुष्काळा मुळे जलस्त्रोत कोरडे पडतात. परिणामी तालुक्यातील अनेक संत्रा उत्पादक शेतकयांनी आपल्या संत्राबागावर बुलडोझर चालवून संत्राझाडे नष्ट केली. यात धूगाव पिंपरी शिवारातील शेतकयांचा सुध्दा समावेश आहे.

अशातच धुगाव पिंप्री गावच्या युवा शेतकरी अमोल लंगोटे यांनी पुढाकार घेऊन लोकवर्गणीतून नदी वर बंधारे बांधले यातून पाणी जमिनीत मुरुन भूगर्भातील पाण्याची पातळी वाढली. या अनुभवातून आता स्वखर्चाने दरवर्षी नदीवर बंधारे बांधण्यावर अनोल लगोटे यांनी भर दिला.चांदूरबाजार तालुक्यातील युगात पिंप्री हा परिसर संत्रा उत्पादनासाठी ओळखला जातो. १२०० शेतकरी सभासद असलेल्या या गावातील २० टक्के क्षेत्रावर संत्राबागांची लागवड आहे सन



२०१८-१९ मध्येदेखील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात पाणी समस्या ला सामोरे जावे लागले होते भूजलपातळी मोठ्याप्रमाणावर खालावली ३०० फुटांवर पाणी असताना ८०० फुटांपर्यंत बोअरवेल घेतल्यानंतरही पाणी लागत नव्हते.अखेर ग्रामस्थांनी एकत्र येत यावर तोडगा काढण्यासाठी काय करता येईल, यावर मंथन सुरु केले. यातून परिसरातील पूर्णा नदीच्या पात्रात तेथील वाळू, दगडाचा वापर करुन बंधारा टाकून नदीत असलेले पाणी अडवून ते जिरविण्यात यावे, असे ठरलेलोकवर्गणीतून हे काम करण्याचा निर्णय झाला त्यानुसार या कामासाठी लोकवर्गणीतून ५५ हजार रुपये

> दुष्कार अनुभवल्यानंतर काही वर्षापासून जलसंधारण कामात सातत्य राखले आहे. सता ते दीड लाख रुपयांचा यावर खर्च होतो. सप्टेंबर किंवा ॲक्टोबर महिन्यात पाण्याची पातळी कमी होताच हे काम केले जाते. नदीतील टोक, दगड, वाळू यांच्या वापरामुळे पाण्याचा चांगला निचरा होतो जमिनीच्या खालील बाजूस पाषाण नसल्यामुळे पाणी अधिक गतीने मुरण्यास मदत होते.
>
> **अमोल लंगोटे, शेतकरी, थुगाव पिंप्री**

जमा झाले. या निधीतून पोकलैंडचा वापर करून नदीवर बाथ टाकप्यात आला. यातून बऱ्याच अंशी पाणी समस्येचे निराकरण झाले असले तरी दुसऱ्या वर्षो मात्र लोकवर्गणीसाठी कोणीच तयार होत नव्हते त्यामुळे सन २०११-२० पासून हा सर्व खर्च अमोल लंगोटे यानीच केला. परिणामी पाच कि. मी थूगावसह परिसरातील जसापूर, निभोरा, पिपळखुटा, शिरजगाव या भागातील जमिनीतील पाण्याच्या पातळीत वाढ झालेली दिसून येत आहे. असे असले तरी नजीकच्या विश्रोली येथील प्रकल्पामुळे पूर्णा नदी कोरडी पडते, हा अनुभव असल्याचे लंगोटे सांगतात.

# 'सुपर'मध्ये दुर्मिळ कॅन्सरवर यशस्वी शस्त्रक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**



स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय ( सुपर स्पेशलिटी) अमरावती येथे पहिल्यांदाच वुल्व्हाचा बेसल सेल कार्सिनोमा या अतिशय दुर्मिळ प्रकारच्या त्वचेच्या कॅन्सरवरील यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली. सदर रूग्ण चांदूरबाजार येथील असून ६० वर्षीय महिला आहे.

सदर महिला मधुमेह व उच्च रक्तदाब असलेली रुग्णालयात दीर्घकाळ भरून न निघालेल्या वुल्व्हाच्या अल्सरच्या तक्रारीसह दाखल झाली होती. रुग्ण सध्या स्थिर आहे व कॅन्सरमुक्त आहे.सदर शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत विनामूल्य करण्यात आली. विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली कॅन्सर तज्ज्ञ डॉ. आयुष हेडा, डॉ. मनन बुब, बाधिरीकरण तज्ज्ञ सपना अग्रवाल, डॉ. माधुरी गाडेकर, अधिपरिचारिका चंदा खोडके यांच्या सूचनेनुसार इन्चार्ज सिस्टर बिल्कीस शेख, अपेक्षा वाघमारे, कोमल खाडे, जया वाघमारे, ज्योती मुंदाने, करण सरदार, लक्ष्मी सोनवणे, सचिन शेरे यांचे शस्त्रक्रियेमध्ये सहकार्य लाभले.

# कारवाईऐवजी गुटखा विक्रेत्याची धुलाई साध्या वेशातील ते पोलिस कोण ? चर्चेचा विषय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८भातकुली**

मोठ्याप्रमाणावर प्रतिबंधित गुटखा असणाऱ्या व्यक्तीवर कारवाई न करता दोन साध्या वेशातील पोलिसांनी त्याची चांगलीच धुलाई केली. ही घटना भातकुली ते आसरा मार्गावरील सायत गावाजवळ असलेल्या पाण्याच्या टाकीजवळ घडली.सायत गावाजवळील पाण्याच्या टाकीजवळ दोन साध्या वेशातील पोलिस पल्सरने आले व त्यांनी दुचाकीवर गुटखा वाहून नेणाऱ्या व्यक्तीला थांबवून त्याच्या जवळील मालाची तपासणी केली. त्यानंतर पोलिसांनी त्यालापकडून फरफटत नेले व नंतर त्याला चांगलाच चोप दिला व नंतर पोलिस तेथून निघून गेले. गुटखा जप्त न करता त्याला मारहाण करून निघून जाणारे ते साध्या वेशातील पोलिस कोण आहेत, असा प्रश्न सामान्य जनतेला पडला आहे. ज्या ठिकाणी ही घटना घडली, तेथे त्या पोलिसांची ड्युटी होती काय, हासुध्दा प्रश्न महत्त्वाचा आहे. गुटखा विक्रेत्याजवळ अंदाजे ७ हजार रूपये किंमतीचा गुटखा असल्याचे समजते.

# सहा महिन्यांपूर्वी उद्घाटन झालेला रस्ता एकाच पावसात जलमय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८दर्यापूर**

नगरपालिका हद्दीतील अतिशय उच्चभ्रू वस्ती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सांगबुदकर नगराची दयनीय अवस्था झालेली आहे. गेल्या सहा महिन्यांपूर्वी एका राजकीय नेत्याच्या हस्ते उद्घाटन झालेला रस्ताही पावसात वाहून गेला.



या नगरामध्ये जाण्यासाठी एकही रस्ता सुरळीत नसल्यामुळे याचा नाहक त्रास जनतेला व व्यापाऱ्यांना सहन करावा लागत आहे. नगरपालिका प्रशासनाला गेल्या कित्येक वर्षांपासून वारंवार निवेदन देऊनसुद्धा नगरपालिका प्रशासन झोपेचे सोंग घेत आहे. दरवर्षी पावसाळ्यामध्ये या नगरात जाण्या-येण्यासाठी मोठी अडचण निर्माण होतो. तरी मात्र नगरपालिकाप्रशासनाला अद्यापही जाग आलेली नाही, तर दुसरीकडे विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी स्थानिक राजकीय पुढाऱ्यांनी या रस्त्याचे उद्घाटन केले; मात्र आज उद्घाटन करून सहा महिने पूर्ण झाले. तरीही या रस्त्याच्या बांधकामाला अद्यापही सुरुवात झालेली नाही. म्हणजे निवडणुकीच्या पूर्वी उद्घाटन करायचे आणि जनतेची मते घ्यायची का? असा प्रश्न आता या नगरातील जनतेने उपस्थित केलेला आहे.तर दुसरीकडे चार महिन्यांच्या आत नगरपालिकेच्या निवडणुका होणार असल्याची घोषणा केली जात आहे. त्यामुळे आता येणाऱ्या नगरपालिका निवडणुकीत जनतेनेसुद्धा विचार करूनच मतदान करावे. जेणेकरून अशा अडचणींना सामोरे जावे लागणार नाही. जनतेला होत अडचणी पाहून झोपेत असलेल्या नगरपालिका प्रशासनाला आता तरी जाग येणार का आणि या रस्त्यावर पडलेल्या खड्यांवर मुरूम पडणार का, हेसुद्धा पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# मत्स्यविज्ञान महाविद्यालय बचाव समितीचा मोर्चा

## अप्पर वर्धा वसाहतीतील अतिक्रमण हटविण्याची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ मोर्शी**

अप्पर वर्धा वसाहतीच्या शासकीय जागेवर अनधिकृतपणे ताबा मिळवून वास्तव्य करणाऱ्यांचे अतिक्रमण त्वरित हटविण्यात यावे या मागणीसाठी मत्स्यविज्ञान महाविद्यालय बचाव संघर्ष कृती समितीने भव्य मूक मोर्चा काढला आणि तो तहसील कार्यालयावर धडकला.

एक लेखी निवेदन तहसीलदार विनोद वानखडे यांच्यामार्फत जिल्हाधिकारी अमरावती, उपविभागीय अभियंता अप्पर वर्धा धरण विभाग मोर्शी यांना देण्यात आले. पश्चिम विदर्भात पहिले व देशात दुसऱ्या क्रमांकाचे होणाऱ्या मत्स्यविज्ञान महाविद्यालयासाठी राखीव ठेवण्यात आली आहे. मोर्शीपासून अवघ्या सात किमी अंतरावर असलेल्या सिंभोरा येथे अप्पर वर्धा धरणाचे बांधकाम सुरू असताना पाटबंधारे विभागाच्या वतीने प्रशासकीय कामासाठी शासकीय कार्यालये व कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी सुसज्ज अशी वसाहत निर्माण करण्यात आली होती. अप्पर वर्धा जलाशयाच्या बांधकामाला जवळपास ३५ ते ४० वर्षे झाले असून अनेक कार्यालये इतरत्र हलविण्यात आले आहे. अधिकारी व कर्मचा-यांच्याविविध ठिकाणी बदल्या झाल्यामुळे बांधकाम करण्यात आलेल्या वसाहतींमध्ये कोणीच राहत नसल्यामुळे ही वसाहत भकास अवस्थेत पडलेली होती. या पडक्या इमारतीत अनेक अवैध व्यवसाय सुरू आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी या वसाहतीत अवैधरीत्या सावकारी करणाऱ्या महिलांवर कारवाई करण्यात आली होती. त्याचप्रमाणे या वसाहतीच्या पडक्या इमारतीतून चोरी झालेली दुचाकी सुद्धा आरोपीसह पोलिसांनी जप्त केली होती.राज्य शासनाच्या वतीने गेल्या आठ वर्षापासून रखडण्यात आलेल्या शासकीय मत्स्यविज्ञान महाविद्यालयाला मार्च २०२५ ला मंजुरी मिळाली असून यावर्षी शैक्षणिक वर्ष सुरू करायचे आहे. महाविद्यालयाचे काम यद्धस्तरावर सुरू करण्यासाठी येथील शासकीय जागेवरचे अतिक्रमण त्वरित हटविण्यात यावे, यासाठी सर्वपक्षीय कार्यकर्ते एकवटले आहे. शासन व प्रशासनाच्या वतीने या गंभीर समस्येची दखल घेण्यात यावी. अन्यथा यापुढे तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा कृती समितीच्या वतीने देण्यात आला.

# अ. भा. गुरुदेव सेवा आश्रमच्या मध्यवर्ती प्रतिनिधीपदी येनोरकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८धारणी :**

येथील श्री गुरुदेव सेवा मंडळ शाखा सेवा अधिकारी तसेच अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा आश्रम गुरुकुंज मोझरीचे धारणी तालुका सेवा अधिकारी सुभाष येनोरकर यांची नुकतीच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी स्थापन केलेल्या संस्था अखिल भारतीय गुरुदेव गुरुकुंज आश्रमच्या मध्यवर्ती प्रतिनिधी म्हणून नुकतीच निवड केली आहे.सुभाष येनोरकर यांनी गेल्या पंचवीस वर्षापासून मेळघाटमध्ये ग्रामगीतेचा प्रचार- प्रसार केला असून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आदिवासी आश्रमशाळा भोकरबर्डी येथे १९८८ते २०२० पर्यंत मुख्याध्यापक म्हणून सेवा दिली आहे. मुलांना सामुदायिक प्रार्थना, ध्यान, पाठ, भजन, कीर्तन, पाठांतर करून घेतले. मुले आकाशवाणी नागपूरपर्यंत गेली.शासनाने त्यांच्या समाज सेवेबाबत त्यांना आदिवासी सेवक पुरस्काराने आदिवासी विकास विभागाने सन्मानित केले. त्यांच्यामार्फत मेळघाटमधील गावोगावी जाऊन सामुदायिक प्रार्थना व ज्ञान शिकविण्याचे कार्य सुरू आहे.

# महामंडळाचा गलथान कारभार , भंगार बसेसचा फटका प्रवाशांच्या जीव टांगणीवर

## खासदार बळवंत वानखडे यांनी धरले अधिकाऱ्यांना धारेवर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८दर्यापूर**

महाराष्ट्र परिवहन विभागाच्या शिवशाही वाहनाने एम एच ०९ ई एम २५३० लायनरच्या खराबीमुळे अचानक पेट घेतला , महामंडळाचा गलथान कारभार व भंगार बसेसमुळे प्रवाशांच्या जीव टांगणीवर आला असून यावेळी बस मध्ये १५ ते २० प्रवासी होते , दरम्यान दुसरे वाहन एम एच १४ कन्८२३५ वलगाव पोलीस स्टेशन समोर ना दुरुस्तीमध्ये बंद पडले होते या सर्व प्रकारामुळे प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. दरम्यान दर्यापूर - अमरावती मार्गावर नियमित प्रमाणे




कामानिमित्त खासदार बळवंतभाऊ वानखडे अमरावती लोकसभा हे दौऱ्यावर असताना, वरील प्रकार लक्षात येतात त्यांनी तत्काळ आपले वाहन थांबवून वाहक व चालकांना प्रवासी खाली उतरवन्याबाबत सूचना दिल्यात. याप्रसंगी विभागीय नियंत्रक बेलसरे साहेब त्याच्यासोबत भ्रमणध्वनी वरून चर्चा करून दर्यापूर आगारासह संपूर्ण जिल्ह्याला नवीन बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी केली. मात्र यावेळी सर्व झालेल्या नाहक त्रासामुळे प्रवाशांना संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली.

# चांदूरबाजारच्या स्टेशन मॅनेजरची ऑनलाईन फसवणूक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८चांदुर बाजार**

चांदूरबाजार रेल्वेस्टेशनच्या मॅनेजरची अज्ञात मोबाईलधारकाने अंदाजे ५० हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे.

अजय राजकुमार रौराळे (३१) असे फिर्यादीचे नाव आहे. ते रेल्वे स्टेशनचे मॅनेजर आहे. २९ एप्रिलरोजी त्यांना





९६९२८७७३६३ वरून फोन आला. मी एसबीआय क्रेडिट कार्ड ऑफिसमधून बोलतो, हेल्थ इन्शुरन्स बंद करण्यासाठी फोन केला, असे सांगून लगेच त्यांचा मोबाईल हॅक झाला. दोन तासांनी त्यांना क्रेडिट कार्डमधून ६ हजार ५९१ व ४३ हजार ९९० रुपयांचे ट्रान्जेक्शन झाल्याचा मॅसेज आला.

# अवकाळी पाऊस उठला शुभमंगल कार्याच्या मुळावर : ग्रामीण भागात सुरू आहे तारेवरची कसरत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८परतवाड़ा**

मे महिना हा शेतकऱ्यांसाठी काहीसा फुरसतीचा महिना असल्याने या महिन्यात ते मोठ्या प्रमाणाठर लग्न समारंभाचा धडाका लावतात. जिल्ह्यात आताही मोठ्या प्रमाणावर लग्न आहेत. मात्र गेल्या काही दिवसांपासून अवकाळी पाऊस त्यांच्या या शुभमंगल कार्याच्या मुळावर उठला असून ग्रामीण भागात सध्या तारेवरची कसरत सुरु आहे.

याही वर्षी मे महिन्यात मोठ्या



प्रमाणावर लग्न समारंभाचे आयोजन आहे मात्र गेल्या काही दिवसांपासून वादळी वाऱ्यासहअवकाळी पावसाने सर्वत्र हजेरी लावणे सुरु केले. त्यामुळे लग्न समारंभात फार गोठी बाधा या अवकाळीने करणे सुरू केले आहे.लग्न समारंभासाठी वर वधू पक्षाकडील महकी, नातेवाईक, मित्रमंडळी यांची फार गोठी हजेरी लावतात, त्यांच्या राहण्याची व्यवस्था मंडप डेकोरेशन, जेवणाची सोय, बँड अशा बऱ्याच व्यवस्था या निमित्ताने कराव्या लागतात. परंतु यामध्ये फार मोठी अडचण सध्या हा अवकाळीचा धुमाकूळ घालत आहे. ग्रामीण भागात ना मंगलकार्यालय ना इतर कुठल्या व्यवस्था नसल्यामुळे त्यात विजेचा सतत लपंडाव, अपुऱ्या मोकळ्या जागा अशा अनेक समस्येचा सामना करावा लागत असल्यामुळे तारेवरची कसरत पहावयास मीळत आहे.११ जूनपर्यंत लग्नाच्या तारखा असून त्यात ८ जूनपर्यंत जास्त तिथा आहेत. त्यामुळे ज्यांच्याकडे लग्न समारंभ आहेत. त्यांची दिवसेंदिवस सततच्या अवकाळीमुळे धाकधूक वाढतच आहे.

# राहुल गांधींना धमकी ,सत्यजित तांबे यांच्या वक्तव्यावरून काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर आक्रमक

## सत्यजित तांबेंनी पंतप्रधान मोदींना फोन लावावा अन् एक तासात भेट घेऊन दाखववावी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**

एकीकडे विविध मुद्द्यांवरून राजकीय वर्तुळात घडामोडींना वेग आला आहे. दावे-प्रतिदावे केले जात आहेत. आगामी महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी सर्वच पक्ष कंबर कसून तयारीला लागले आहेत. यातच राहुल गांधी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकांबद्दल अपशब्द वापरले तर ते नाशिकला आल्यावर त्यांच्या तोंडाला काळे फासू, काळे फासता आले नाही तर त्यांच्यावर दगडफेक करू, असा इशारा ठाकरे गटाचे नेते बाळा दराडे यांनी दिला आहे. यावरून आता काँग्रेस पक्ष आक्रमक




झाला आहे. ठाकरे गटाला प्रत्युत्तर देताना काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी सत्यजित तांबे यांनी केलेल्या विधानाचाही समाचार घेतला.

राहुल गांधी यांना धमकी देणे सोपे नाही, असे कोणीही वायफळ बडबड करत असेल, तर खबरदारी आम्हाला घेता येते. आम्ही शांततेने वागणारी मंडळी आहोत. महात्मा गांधी यांच्या अहिंसेच्या मार्गावर जाणारे आहोत. पण, आता कलयुग आहे, आम्हालाही कलयुगासारखे वागता येते. राहुल गांधी काहीच चुकीचे बोललेले नाहीत. इतिहासात जे लिहिले आहे, ते परत सांगत असतील, तर त्यात वावगे काय आहे? कोणी माफी मागितली, कोणी काय केले, हे इतिहासात आहे ना? इतिहास बदलू शकणार नाही. गांधी कुटुंबाला सर्वांत जास्त दहशतवादाचा सामना करावा लागला आहे. अशा वेळेस राहुल गांधी यांना तुम्ही काही बोलत असाल, तर कुणी खपवून घेणार नाही, असा स्पष्ट इशारा यशोमती ठाकूर यांनी दिला. यावेळी सत्यजित तांबे यांनी केलेल्या विधानाबाबत यशोमती ठाकूर यांना प्रश्न विचारण्यात आला.

सत्यजित तांबे हे काँग्रेसचे आहेत आणि आता ते अपक्ष निवडून आले आहेत. त्यामुळे, सत्यजित तांबे यांनी पंतप्रधान मोदींना फोन लावावा. याशिवाय महाराष्ट्रातील कोणीही मोदींना फोन करावा. मोदीजींनी तासाभरात कुणाला अपॉइंटमेंट दिली तर मग आम्ही पण तसेच बोलू शकतो, असे आव्हान ठाकूर यांनी दिले. तसेच राहुल गांधी सर्वसामान्यांमध्ये मिसळतात, भेट देतात, बोलतात, समन्वय साधतात. प्रत्येक पक्षाचा आपापला प्रोटोकॉल असतो, तो प्रोटोकॉल फॉलो केला जातो. ज्यांनी पक्ष सोडायचा विचार केला, अलिप्त राहण्याचा विचार केला त्यांना पक्षावर बोलण्याचा अधिकार नाही, असा पलटवार ठाकूर यांनी केला.

दरम्यान, अपक्ष आमदार सत्यजित तांबे यांनी काँग्रेसचे प्रमुख नेते आणि लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर टीका केली होती. काँग्रेस हा देशातील विचार आहे, तो संपणार नाही. राहुल गांधी काँग्रेस नेत्यांनाही सहजासहजी उपलब्ध होत नाहीत. छातीठोकपणे सांगतो की, महाराष्ट्रातील कोणत्याही नेत्यांनी एक तासाच्या आत राहुल गांधींची अपॉइंटमेंट घेऊन त्यांना भेटायला जाऊन दाखवावे, असे सत्यजित तांबे यांनी म्हटले होते.

# विदर्भ नदीवरील पुरात गाडी वाहून गेली, एकाचा मृत्यू, एक जखमी

## पुराच्या परिस्थितीत प्रवास टाळण्याचे प्रशासनाकडून आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८यवतमाळ**



वणी तालुक्यातील कायर येथे विदर्भ नदीवरील पुरात चारचाकी वाहन वाहून गेले. विदर्भ नदीवरील पुलावरून जात असताना पुराच्या जोरदार पाण्यामुळे चारचाकी प्रवासी वाहनाचा ताबा सुटून गाडी नदीत कोसळली. या दुर्घटनेत वाहनातील एकाचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला. ही घटना मंगळवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास घडली. या दुर्घटनेत रामा उध्दव कणाके (४०), रा. उमरी, ता. वणी यांचा मृत्यू झाला तर भास्कर संभाजी पुसाम (४३), रा. उमरी हे गंभीर जखमी झाले.

उमरी (ता. वणी) येथील भास्कर संभाजी पुसाम आणि रामा उध्दव कणाके हे दोघेजण मंगळवारी रात्री डोंगरगाव येथून परतत होते. दिवसभर पावसाची संततधार असल्याने विदर्भ नदीवरील पुलावरून पुराचे पाणी वाहत होते. यावेळी रामा याने वाहन पुराच्या पाण्यातून काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पुराच्या पाण्याचा जोर इतका होता की वाहनाचा ताबा सुटून गाडी नदीत कोसळून वाहून गेली. या दुर्घटनेत रामा कनाके याचा मृत्यू झाला असून भास्कर पुसाम गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना तातडीने ग्रामीण रुग्णालय, कायर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

या घटनेची माहिती मिळताच मुकुटबन पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले आणि मदत कार्य सुरू केले. मुकुटबन पोलीस स्टेशन व स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने शोध व बचाव कार्य पार पाडण्यात आले. आज रामा कनाकेचा मृतदेह सापडला. या अपघातात मॅजिक गाडी पूर्णतः नुकसानग्रस्त झाली असून ती रामा कनाके यांच्या मालकीची होती. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी पुराच्या पाण्यात वाहन चालवू नये व पुराच्या परिस्थितीत प्रवास टाळण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांना खरिपाच्या तोंडावर बसणार महागाईची झळ

## बियाणे आणि मिश्र खतांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत ६० ते २५० रुपयांची दरवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

ऐन खरिपाच्या तोंडावर शेतकर्यांना पेरणीसाठी लागणार्या बियाणे आणि मिश्र खतांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत ६० ते २५० रुपयांची दरवाढ झाली असल्याने शेतकर्यांना या महागाईचा फटका बसणार आहे.



खरीप हंगामात प्रामुख्याने मका, सोयाबीन, कापूस, उडीद, तूर, बाजरी व मूग या पिकांची पेरणी केली जाते. यावर्षी खरीप हंगामासाठी बियाणे बाजारपेठेत उपलब्ध झाले असून काही कंपन्यांचे मका बियाणे हे १०० ते २०० रुपयांनी महागले आहे मकाचे ४ किलो बियाणे पाकीट ८०० ते २२५० रुपयांपर्यंत आहेत तर कपाशीचे बियाणे पाकीट ४० रुपयांनी महाग झाले आहे. गतवर्षीच्या तुलनेत डीएपी वगळता अन्य खतांच्या बॅगमध्ये १८० ते २८० रुपयांची वाढ झाली आहे यामध्ये १२:३२:१६ या ग्रेडमध्ये वाढ झाली आहे. १०:२६:२६, १५:१५:१५, २०:२०:०:१३,यामुळे खरिप पेरणीचे बजेट वाढणार आहे.

# पडीक जमिनीवर औषधाची लागवड करा अन् मालामाल व्हा

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड योजना ठरतेय फायदेशीर


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

शेतकऱ्यांनी त्यांच्याकडे असलेल्या शेतीतून रोजगार व आर्थिक उत्पन्न मिळवून देण्याच्या उद्देशाने तसेच शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती व्हावी, यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या कृषी विभागामार्फत विविध योजना राबविल्या जातात. यात जमिनीवर औषधी वृक्ष लागवड, फूल पीक, तसेच फळबाग लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड योजना राबविण्यात आली आहे.

फळबाग व औषधी वृक्ष लागवड या योजनेला प्रोत्साहन देण्यासाठी नवीन फळ पिके व फूल पिके यांचा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत समावेश करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत वैयक्तिक बांधावर, सलग शेतावर व पडीक जमिनीवर फळझाड व फूल पीक लागवड करता येते. करंज, अर्जुन, आसाम बेहडा, हिरडा, बेल, रक्तचंदन, रिटा, शिवण, गुगळ बिबा, आंबा आदी झाडांची लागवड करता येते.एमआरईजीएस या योजनेत फक्त अल्पभूधारक शेतकरी सहभागी होऊ शकतात. यासाठी त्यांना सातबारा/आठ अ, जॉब कार्ड, ग्रामपंचायत ठराव, आधार कार्ड, बैंक पासबुक या कागदपत्राची आवश्यकता असते.

**पडीक जमीन, बांध हमखास मिळवून देईल पैसा**

नवीन फळ पिके व फूल पिके यांचा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत समावेश करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत वैयक्तिक बांधावर, सलग शेतावर व पडीक जमिनीवर फळझाड व फूल पीक लागवड करता येते. आपण शेतात सहसा



बांध किंवा पडीक जागेत काही लागवड करत नाही, पण शासनाच्या योजनेमुळे फळबाग किंवा औषधी वृक्ष लागवड केल्यास भविष्यात शेतकऱ्यास पैसा मिळवून देणार हे नक्की.

**किती अनुदान मिळणार**

या योजनेंतर्गत शेतामध्ये पडीक जमिनीवर किंवा बांधावर औषधी वनस्पती लागवडीसाठी अनुदान देण्यात येते. हे अनुदान पीकनिहाय वेगवेगळे असते. यात करंज, अर्जुन, आसाम बेहडा, हिरडा, बेल, रक्तचंदन, रिठा, शिवण, गुगळ, बिबा यांसाठी ८२ हजार १७९ रुपये, शिंदी १ लाख ९८२ रुपये, साग १ लाख ५१ हजार ७९१, बांबू २७हजार २६ रुपये प्रति हेक्टरी अनुदान मिळते.

**लाभ कोण घेऊ शकणार**

या योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकरी हा अल्प भूधारक असणे आवश्यक आहे. अल्प भूधारकमध्ये जमीन क्षेत्र मर्यादा ही अर्धा एकरपासून ते दोन हेक्टरपर्यंत असते.या योजनेंतर्गत वैयक्तिक बांधावर, सलग शेतावर व पडीक जमिनीवर फळझाड व फूल पीक लागवड शेतकऱ्यांना करता येते.

# मे महिन्यातच धोधो पाऊस, पूर्णेला पूर! उन्हाळा की पावसाळा?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८बुलढाणा**

जवळपास एक महिन्यापासून नियमित अंतराने पडणारा पाऊस, शेतमालाचे नुकसान, विजांचे तांडव आणि यावर कळस म्हणजे नदी नाल्याना आलेले पूर असा सध्या जिल्ह्यातील मौसमाचा माहोल आहे. यामुळे उन्हाळा की पावसाळा असा मजेदार प्रश्न संशोधकांसोबतच सर्वसामान्य नागरिकांनाही पडला आहे.



बुलढाणा जिल्ह्यात चालू मे महिन्यात रोज पाऊस पडणे वादळी वारे आणि विजाचे तांडव ही नवलाईची बाब राहिली नाहीये! दुपार पर्यंत कडक उन्ह, नंतर ढगाळ वातावरण, आणि संध्याकाळी, रात्री पडणारा रिमझिम वा दमदार पाऊस ही रोजची बाब ठरली आहे.मंगळवारी,२७ मे रोजी देखील रात्री पावसाने जिल्ह्यात सर्वदूर हजेरी लावली. मलकापूरचा अपवाद वगळता इतर १२ तालुक्यात मुसळधार पावसाने हजेरी लावली. तीन तालुक्यात तर अतिवृष्टीची नोंद झाली आहे. सिंदखेड राजा ७१ मिमी, देऊळगाव राजा ६९ मिमी आणि जळगाव जामोद ६६. ८ मिमी या तालुक्यात कोसळधार पाऊस झाला असून अतिवृष्टीची नोंद झाली आहे. संग्रामपूर ४६ मिमी चिखली ५५मिमी, बुलढाणा ४१, मेहकर ५५ मिमी, लोणार ५८, खामगाव ५५ मिमी, शेगाव ४१, नांदुरा ३० मिमी या तालुक्यातही जोरदार पाऊस झाला.

पश्चिम विदर्भाची जीवन वाहिनी समजली जाणारी पूर्णा नदी यंदा मे महिन्यातच प्रवाहित झाली आहे. गेल्या अनेक दिवसापासून अमरावती, अकोला, वाशिम सह बुलढाणा जिल्ह्यात बरसत असलेल्या पावसाने पूर्णा नदीला आज मोठा पूर आला आहे. मे महिन्यातच पूर्णा नदी प्रवाहित झाल्याने बुलढाणा जिल्ह्यातून जाणाऱ्या या नदी परिसरातील नागरिक आनंदित आहेत.

# रेल्वे प्रवाशांसाठी महत्वाचे; नरखेड मार्गावर मेमू ट्रेनच्या वेळा बदलल्या



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

प्रवाशांना सोयीचे व्हावे आणि मेमू ट्रेनचे संचालन अधिक कार्यक्षम व्हावे, या हेतूने मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने बडनेरा- नरखेड मार्गावरील गाड्यांचे वेळापत्रक बदलविण्याचा निर्णय घेतला आहे. नवे वेळापत्रक ५ जूनपासून लागू केले जाणार आहे.

मध्य रेल्वेच्या नव्या निर्णयानुसार गाडी क्रमांक ६११०३ बडनेरा-नरखेड मेमू ही गाडी बडनेरा येथून आता रोज दुपारी १:०५ वाजता सुटेल आणि नरखेडला सायंकाळी ४ वाजता पोहोचेल. त्याचप्रमाणे गाडी क्रमांक ६११०४ नरखेड बडनेरा मेमू रोज नरखेड येथून सायंकाळी ५:१० वाजता सुटेल आणि बडनेरा येथे रात्री ८:३५ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ६११०५ बडनेरा नरखेड मेमू दररोज सकाळी ६:४० वाजता बडनेरा स्थानकातून प्रस्थान करेल आणि सकाळी ९:३० वाजता नरखेड स्थानकात पोहोचेल.

गाडी क्रमांक ६११०६ नरखेड-बडनेरा मेमू दररोज सकाळी १०:१० वाजता नरखेड येथून सुटेल आणि दुपारी १:४० वाजता बडनेरा येथे पोहोचेल.

नव्या निर्णयानुसार, गाडी क्रमांक २६११२३ आमला-छिंदवाडा मेमू ट्रेन आता रोज सकाळी ८:२० ला सुटणार असून, छिंदवाडा येथे ११:३० वाजता पोहोचेल. आधी या गाडीची आमला येथून सुटण्याची वेळ सकाळी ८ वाजताची होती.

**सेवा सुसंगत होण्याचा दावा**

मेमू गाड्यांच्या नेहमी उशिरा पोहचत असल्याने प्रवाशांची नेहमीच ओरड ऐकायला मिळते. या सुधारित वेळापत्रकामुळे नागपूर-आमला-छिंदवाडा व बडनेरा-नरखेड मार्गावरील मेमू सेवा अधिक सुसंगत आणि प्रभावी होईल आणि प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकारक होमे महिन्यातच धोधो पाऊस, पूर्णेला पूर! उन्हाळा की पावसाळा? ईल, असा दावा रेल्वे प्रशासनाने केला आहे.

नरखेड रेल्वे मार्ग बऱ्याच वर्षांच्याा प्रतीक्षेनंतर पूर्ण झाला. पण, अजूनही या मार्गावर रेल्वेगाड्यांची संख्या वाढलेली नाही. या मार्गावरून हैद्राबाद, अजमेर, वैष्णोदेवी, दिल्ली येथे जाण्यासाठी एक्सप्रेस गाड्या या मार्गाने सुरू करण्याची मागणी प्रवाशांनी केली आहे.

# संस्थात्मक प्रसूतीचा दर वाढवण्यासाठी काय नियोजन केले?

## डीएचओनी घेतली कर्मचाऱ्यांची शाळा; प्रा.आ.केंद्र येवदा येथे मॅरेथॉन बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८दर्यापूर**

शासकीय रुग्णालय नागरिकांना आपलं रुग्णालय वाटायला हव. आपल्या दवाखान्यात नागरिकांनी आनंदाने उपचार घ्यायसाठी यायला हवं असं सांगत संस्थात्मक प्रसूतीचा दर वाढवण्यासाठी आपण काय नियोजन केले आहे, असे अनेक प्रश्न विचारून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुरेश आसोले यांनी कर्मचाऱ्यांची चांगलीच शाळा घेतली.



दर्यापूर तालुक्यातील येवदा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुरेश आसोले यांनी मंगळवारी (ता.२७) मॅरेथॉन आढावा बैठक घेतली. या बैठकीला नकुल सोनटक्के शुभम बायस्कार, मनोज पाथरकर, डॉ.अरुण चोरे, डॉ.संजय पाटील, किरण देशमुख, शिल्पा निमकर, माला डोईफोडे, मयूर वांदे, ऋषिकेश इंगळे, संदीप रोहनकर, पंकज कान्हेरकर अभिषेक मावळे निखिलेश ठाकूर, शंकर चोरे, डॉ.गुंजन गुल्हाने यांच्यासह अन्य उपस्थित होते.दरम्यान जिल्हा आरोग्य अधिकारी सुरेश असोले यांनी, आरोग्य विभागाच्या विविध योजनांची माहिती नागरिक व आरोग्य कर्मचाऱ्यांना दिली. प्रधानमंत्री मातृ वंदन योजना, गोल्डन कार्ड या महत्त्वकांक्षी योजना प्रभावीपणे राबवावे अशा सूचना देखील आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांना दिल्या. शिवाय आरोग्य सेवा अधिक लोकाभिमुख व्हायला हवी यासाठी आरोग्य सेवेतील कर्मचाऱ्यांनी मुख्यालय राहून नागरिकांना सेवा द्यावी. यासह विविध बाबींचा आढावा देखील जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी घेतला. बॉक्सग्रामीण रुग्णालयाच्या कामाकाजाला गतीशासनाकडून येवदा येथे ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्यात आले. राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी या भागाचा पालकत्व घेतल्याने रुग्णालयाचे कामकाज गतीने पुढे जावे यासाठी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना त्यांनी सूचना दिल्या होत्या. त्यानुसार आसोले यांनी येवदा येथे भेट दिली. भेटी दरम्यान, प्रस्तावित ग्रामीण रुग्णालयासाठी अद्यावत सोई सुविधा विकसित करणे, मनुष्यबळ भरती प्रक्रिया, यंत्रसामुग्रीची उपलब्धता या बाबींचा त्यांनी सखोल आढावा घेतला. त्यामुळे ग्रामीण रुग्णालयाचे कामकाज अधिक गतीने पुढे जाताना पाहायला मिळत आहे.

